# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## २०१०-२०११

## ( बारावी महाराष्ट्र विधानसभा )

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्याकरिता राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना संबंधीचा अहवाल**

# चौथा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला
दिनांक ८ डिसेंबर, २०१० रोजी सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, नागपूर
डिसेंबर, २०१०

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## २०१०-२०११

## ( बारावी महाराष्ट्र विधानसभा )

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. या कार्यालयातील
अनुसूचित जमातीच्या अधिकारी/ कर्मचारी यांची भरती,
बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्याकरिता
राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना
संबंधीचा अहवाल

# चौथा अहवाल

एचबी-१८५६—१.

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## (२०१०-२०११)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.

**सदस्य :**

*(२) प्रा. वसंत पुरके, वि.स.स.

(३) श्री. रामरतनबापू राऊत, वि.स.स.

(४) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

(५) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.

(६) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

(७) श्री. किसन कथोरे, वि.स.स.

(८) श्री. उमाजी बोऱ्से, वि.स.स.

(९) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

(१०) श्री. दौलत दरोडा. वि.स.स.

(११) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(१२) श्री. एम.एम.शेख, वि.प.स.

**(१३) रिक्त

(१४) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(१५) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. म.मु.काज, उप सचिव

(३) श्री. ला.ना.जाधव, अवर सचिव (समिती)

(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

---

टीप :

*(१) श्री.आनंदराव गेडाम, वि.स.स. यांची विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीवर समिती प्रमुख म्हणून नियुक्ती झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर प्रा.वसंत पुरके, वि.स.स. यांची दिनांक १३ ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

**(२) श्री. राजेंद्र मुळक, वि.प.स. यांची राज्यमंत्री पदी दिनांक १९ नोव्हेंबर, २०१० रोजी नियुक्ती झालेली असल्याने जागा रिक्त.

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## (२००८-२००९)

**समिती प्रमुख**

(१) श्री.म.ना.बरोरा, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री.तुकाराम बिरकड, वि.स.स.

(३) श्री.शशिकांत शिंदे, वि.स.स.

(४) श्री.रमेश चौधरी, वि.स.स.

(५) श्री.सुरेश इंगळे, वि.स.स.

(६) *रिक्त

(७) श्री.राजाराम ओझरे, वि.स.स.

(८) श्री.बबनराव घोलप, वि.स.स.

(९) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.

(१०) डॉ.संदिप धुर्वे, वि.स.स.

(११) श्री.राजकुमार पटेल, वि.स.स.

(१२) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

(१३) श्री.दिलीपराव सोनावणे, वि.प.स.

(१४) श्री.वसंत पवार, वि.स.स.

(१५) श्री.परशुराम उपरकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विजय दि.जोशी, उप सचिव

(३) श्री. ज्ञा.न.माहुरे, समिती अधिकारी

( *श्री.नितिन राऊत, वि.स.स. यांची मंत्रीपदी नियुक्ती झाल्याने सदर जागा रिक्त.)

# प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा चौथा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

समितीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. परिमंडळ, औरंगाबाद व यवतमाळ या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच त्यांच्याकरिता राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत माहिती घेण्याचे ठरविले. समितीने दिनांक २८ जुलै, २००९ रोजी विद्युत वितरण कंपनी परिमंडळ कार्यालय, औरंगाबाद व दिनांक ५ ऑगस्ट, २००९ रोजी विद्युत वितरण कंपनी परिमंडळ कार्यालय, यवतमाळ या दोन्ही कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवून समितीला प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. उक्त बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासित माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ४ जून, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीवर सखोल विचार करून समितीने त्या संदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारूप अहवाल **दिनांक २४ नोव्हेंबर,२०१०** रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व तो संमत केला.

**सुरेश धस,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

**विधान भवन :**
नागपूर,
दिनांक : १ डिसेंबर, २०१०.

# अहवाल

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित परिमंडळ, यवतमाळ**

**(एक) अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी वर्गाचा असलेला अनुशेष व जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी बाबत कार्यवाही**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित हा राज्य शासनाचा एक अंगिकृत उपक्रम असून या उपक्रमांच्या कार्यालयात अनुसूचित जमातीच्या निर्धारित टक्केवारीनुसार पदे भरण्यात आली आहेत काय, या कार्यालयातील भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादी बाबतचा आढावा घेण्यासाठी समितीची दिनांक ५ ऑगस्ट, २००९ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित संचलन व सुव्यवस्था परिमंडळ, यवतमाळ येथे बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीच्या वेळी समितीला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सं.व.सु.मंडल, यवतमाळ या कार्यालयातील वेतन गट-१ व २ मधील पदे मुख्य कार्यालयाकडून भरली जातात. वर्ग ३ व ४ मधील तांत्रिक / अतांत्रिक वर्गाची एकूण किती पदे मंजूर आहेत त्यापैकी डिसेंबर, २००८ अखेर प्रत्यक्षात संवर्गनिहाय किती पदे भरण्यात आली आहेत, मंजूर पदांपैकी संवर्गनिहाय किती पदे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत, याबाबतची माहिती खालीलप्रमाणे समितीला सादर करण्यात आली :

**मंजूर पदे**

| वेतनगट | वेतनगट-३ | | वेतनगट-४ | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| पदाचा संवर्ग (१) | मंजूर (२) | भरलेली (३) | मंजूर (४) | भरलेली (५) | मंजूर (६) | भरलेली (७) |
| तांत्रिक | ३८१ | २८३ | ८२९ | ७३० | १२१० | १०१३ |
| अतांत्रिक | २२२ | १८९ | १० | ४२ | २३२ | २३१ |
| एकूण . . | ६०३ | ४७२ | ८३९ | ७७२ | १४४२ | १२४४ |

**संवर्गनिहाय मंजूर पदांचा तपशिल प्रपत्र-१ प्रमाणे**

## अनुसूचित जमातीची सरळसेवेने भरलेली पदे

| पदाचा | वेतनगट-३ | | वेतनगट-४ | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|
| संवर्ग | राखीव | भरलेली | राखीव | भरलेली | राखीव | भरलेली |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| तांत्रिक | २९ | १७ | ३९ | १३ | ६८ | ३० |
| अतांत्रिक | २३ | ११ | ० | ० | २३ | ११ |
| **एकूण . .** | **५२** | **२८** | **३९** | **१३** | **९१** | **४१** |

## अनुसूचित जमातीची पदोन्नतीने भरलेली पदे

| पदाचा | वेतनगट-३ | | वेतनगट-४ | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| संवर्ग | राखीव | भरलेली | राखीव | भरलेली | राखीव | भरलेली |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| तांत्रिक | १२ | ९ | ३९ | ३४ | ५१ | ४३ |
| अतांत्रिक | ३ | २ | ० | ० | ३ | २ |
| **एकूण . .** | **१५** | **११** | **३९** | **३४** | **५४** | **४५** |

(१) सन २००० ते २००८ पर्यंत नियामक आयोगाच्या आदेशानुसार सरळसेवा भरतीवर बंदी असल्यामुळे सरळसेवेने भरावयाचा अनुसूचित जमातीचा अनुशेष पुर्णपणे भरता आला नाही.

(२) पदोन्नतीने भरावयाचा अनुसूचित जमातीचा अनुशेष अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र वैधता झालेले कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे भरता आला नाही. आता काही तंत्रज्ञ कर्मचाऱ्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केली आहेत. लवकरच निवड समितीची बैठक घेऊन पदोन्नतीमधील अनुशेष भरण्यात येईल.

अनुसूचित जमातीचा अनुशेष खालीलप्रमाणे आहे :

## अनुसूचित जमातीचा सरळसेवेचा अनुशेष

| पदाचा संवर्ग | वेतनगट-३ | वेतनगट-४ | एकूण |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| तांत्रिक | १२ | २६ | ३८ |
| अतांत्रिक | १२ | ० | १२ |
| **एकूण** | **२४** | **२६** | **५०** |

## अनुसूचित जमातीचा पदोन्नतीचा अनुशेष

| पदाचा संवर्ग | वेतनगट-३ | वेतनगट-४ | एकूण |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| तांत्रिक | ३ | ५ | ८ |
| अतांत्रिक | १ | ० | १ |
| **एकूण** | **४** | **५** | **९** |

## संवर्गनिहाय अनुसूचित जमातीची भरण्यात आलेली पदे व अनुशेष प्रपत्र-२ प्रमाणे

समितीच्या बैठकीच्या वेळी उपरोक्त दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सरळ सेवा भरती आणि पदोन्नतीसाठी अनुसूचित जमातीचे आरक्षण किती असावयास पाहिजे. या ठिकाणी दिलेल्या लेखी माहितीनुसार जवळपास ८६ पदे वेतनगट ३ व ४ मध्ये भरलेली आहेत. त्यातील ४५ पदे ही पदोन्नतीने आणि ४१ पदे सरळ सेवेतून भरलेली आहेत. या सर्व उमेदवारांकडून जात वैधता प्रमाणपत्र आलेले आहे काय ? अशी समितीने पृच्छा केली असता, मुख्य अभियंता, यांनी खुलासा केला की, सरळ सेवेतील भरतीसाठी यवतमाळ जिल्ह्यात अनुसूचित जमातीला १४ टक्के आरक्षण आहे आणि पदोन्नतीसाठी ७ टक्के आरक्षण आहे. वेतनगट ३ व ४ मध्ये एकूण ८६ पदे भरलेली आहेत. त्यामध्ये १९९५ पुर्वी किती आणि १९९५ नंतर किती पदे भरली आहेत तसेच १९९५ नंतर पदे भरताना त्यांची जात वैधता प्रमाणपत्र घेतलेली आहेत काय ? अशी समितीने पृच्छा केली असता या कार्यालयाकडे १९९५ पुर्वीची ६९ प्रकरणे आहेत आणि १९९५ नंतरची ३१ प्रकरणे आहेत त्यामध्ये दुसऱ्या जिल्ह्यातून बदली होऊन आलेल्यांचा समावेश असून असे एकूण १०० अनुसूचित जमातीचे कर्मचारी आहेत. १९९५ नंतर जे कर्मचारी सेवेत आलेले आहेत त्या सर्व उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहेत. सरळ सेवेमध्ये अनुसूचित जमातीचा अनुशेष थोडा

शिल्लक आहे परंतु भरती करण्यास परवानगी नसल्याने अनुशेष शिल्लक राहिलेला आहे. सध्या एम.इ.आर.सी.च्या मार्गदर्शनानुसार आढावा घेऊन त्यावेळी असलेला कर्मचाऱ्यांचा अनुशेष भरुन काढण्यात येईल असे महाव्यवस्थापक विद्युत वितरण कंपनी यांनी समितीला सांगितले.

समितीने या कार्यालयाकडे जो अनुशेष शिल्लक आहे तो राज्य विद्युत मंडळ असताना असलेल्या कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार अनुशेष आहे. त्याचाही समावेश यात करावा अशी समितीने सूचना केली तसेच पदोन्नती देताना आता कंपनी ॲक्ट नुसार कारभार चालविला जातो परंतु शासनाकडून चालविले जाणारे हे प्राधिकरण आहे वा महामंडळ आहे तेव्हा पदोन्नती देतांना शासनाचे जे नियम आणि निकष आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच भरती करताना प्रथम अनुसूचित जमातीचा अनुशेष जो भरुन काढावयाचा आहे त्यासाठी प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांच्याशी संपर्क साधावा. अनुसूचित जमातीच्या पदांवर भरती करताना तसेच पदोन्नती देताना संबंधितांकडे जात वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय नियुक्ती वा पदोन्नती देऊ नये असा शासन निर्णय आहे त्यानुसार कारवाई करावी.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मंडळ कार्यालय, यवतमाळ येथे झालेल्या बैठकीच्या वेळी समितीने दिलेल्या निदेशानुसार केलेल्या कारवाईबाबत दिनांक ४ जून, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.** साक्षीच्या बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासित माहितीनुसार, अनुसूचित जमातीची ४५ पदे ही सरळसेवेतून व ४१ पदे ही पदोन्नतीने असे एकूण ८६ पदे वेंतन गट ३ व ४ मध्ये भरलेली आहेत. अनुसूचित जमातीच्या सरळसेवा व पदोन्नतीद्वारे असलेला एकूण अनुशेष ५९ पदांचा शिल्लक आहे. या सर्व उमेदवारांकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेली आहेत काय, त्यात १९९५ पूर्वी किती पदे भरलेली आहेत व १९९५ नंतर किती पदे भरलेली आहेत तसेच १९९५ नंतर पदे भरताना त्याची जात वैधता प्रमाणपत्र घेतलेली आहेत काय अशी विचारणा केली असता, अधिक्षक अभियंता यांनी सन १९९५ पूर्वीच्या ६९ व १९९५ नंतरच्या ३१ असे एकूण १०० अनुसूचित जमातीचे कर्मचारी आहेत. १९९५ नंतरच्या कर्मचाऱ्याची जात पडताळणी प्रमाणपत्र आलेली आहेत. १९९५ पूर्वीची ६९ प्रकरणे आहेत त्यातील २० उमेदवारांनी कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. बैठकीच्या नंतरच्या कालावधीत तीन कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र घेऊन पदोन्नती देण्यात आलेली आहे. अनुसूचित जमातीचा शिल्लक असलेला अनुशेष भरण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे असे समितीला सांगण्यात आले. **सन १९९५ पूर्वीच्या उमेदवारांना संरक्षण दिले आहे. परंतु शासनाने त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यातून सूट दिलेली नाही. ज्या २० उमेदवारांनी कागदपत्र सादर केली नाहीत त्यांना नोटीस काढून कागदपत्र सादर करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत द्यावी.** जर त्यांनी दोन महिन्यात कागदपत्र सादर केली नाहीत तर त्यांना नोकरीवरुन कमी करावे, असे समितीने

निदेश दिले असता, अधिक्षक अभियंता यांनी या प्रकरणांचा विभागातर्फे पाठपुरावा करण्यात येऊन ज्या २० उमेदवारांनी कागदपत्रे सादर केलेली नाहीत त्यांना दोन महिने मुदतीची नोटीस देण्यात येईल जर त्यांनी दोन महिन्यात कागदपत्रे सादर केली नाहीत तर त्यांना नोकरीवरुन कमी करण्यात येईल अशा स्पष्ट सूचना नोटीस मध्ये देण्यात येतील.

वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदांची भरती केंद्रीय पध्दतीने करण्यात येते. समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, केंद्रीय पध्दतीच्या भरती प्रक्रियेमुळे बीड-परळी येथील उमेदवारांची भरती न होता नागपूर, चंद्रपूर या भागातील उमेदवारांची भरतीमध्ये निवड झालेली आहे. या भरती प्रक्रियेमध्ये औरंगाबाद किंवा कोकणातील एकही अनुसूचित जमातीचा उमेदवार नियुक्त झालेला नाही चंद्रपूर जिल्ह्यातील फक्त दोन तालुक्यातील उमेदवार त्या ठिकाणी नियुक्त झाले आहेत. त्यावेळी ३०० ते ४०० उमेदवारांची भरती झालेली आहे. एवढ्या मोठ्या उमेदवारांमध्ये दोन उमेदवार सुध्दा आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रातील अनुसूचित जमातीचे उमेदवार आलेले नाहीत. त्यामुळे या भागातील लोकांना न्याय मिळत नाही. जिल्ह्यातील नामांकित दैनिक वर्तमानपत्रात भरतीची जाहिरात देण्यात यावी. जेणेकरुन त्या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती तेथे होऊ शकेल. जिल्हा पातळीवर परीक्षा घेतली पाहिजे. राज्य पातळीवर परीक्षा घेतल्यामुळे एका विभागातील मुले मागे राहत आहेत. असे समितीने मत व्यक्त केले असता सचिव, ऊर्जा विभाग यांनी जिल्हा पातळीवर परीक्षा घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी परीक्षा केंद्र ठेवण्यात येतील. अनुसूचित जमातीचे आरक्षण जिल्हानिहाय वेगळे असणार आहे. त्याचप्रमाणे स्थानिक दैनिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात येईल. असे समितीला सांगितले.

काही जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातीच्या जागा १९, २२ व २४ टक्के आहेत. ओटीएसपीच्या जागा तेथे कमी आहेत. परंतु आदिवासी बाह्य क्षेत्रातील जिल्ह्यासाठी अनुसूचित जमातीच्या एक ते तीन टक्केपर्यंत जागा असतील तर तेवढ्या जागा त्या ठिकाणी ठेवल्या पाहिजेत. बिंदु नामावली प्रमाणे त्या ठेवण्यात आल्या पाहिजेत असे समितीने मत व्यक्त केले असता सचिव यांनी महाजनकोचे ऊर्जा निर्मिती प्लॅन्ट प्रत्येक जिल्ह्यात नाहीत त्यामुळे महाजनकोच्या ऊर्जा निर्मितीच्या प्लॅन्टमध्ये जिल्हानिहाय आरक्षण ठेवता येणार नाही. महाराष्ट्रात महाजनकोच्या ऊर्जा निर्मिती प्लॅन्ट, परळी, चंद्रपूर, नागपूर, भुसावळ, पारस अशा ठिकाणीच आहेत. तेथे केंद्रिय पध्दतीने भरती प्रक्रिया केली जाते. असे समितीला सांगितले. महाजनकोच्या ऊर्जा निर्मिती प्लॅन्टसाठी केंद्रिय पध्दतीने भरती प्रक्रिया करु शकता. **परंतु महाराष्ट्र विद्युत मंडळाची वितरण व पारेषणाची जी जिल्हानिहाय कार्यालये आहेत त्या ठिकाणी स्थानिक स्तरावर जाहिरात देऊन** भरतीची प्रक्रिया करणे शक्य आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी अशी समितीने मांडलेल्या सुचनेस सचिव, ऊर्जा विभाग यांनी सहमती दर्शवून वितरण व पारेषण या कार्यालयामध्ये जिल्हानिहाय भरती प्रक्रिया करता येईल असे समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. परिमंडळ यवतमाळ या कार्यालयाअंतर्गत भरावयाची तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील पदे सन २००० ते २००८ पर्यंत नियामक आयोगाच्या आदेशानुसार भरतीवर बंदी असल्यामुळे अनुसूचित जमातीची सरळ सेवेतील वेतन गट-३ मध्ये २४ व वेतन गट-४ मध्ये २६ अशी एकूण ५० पदांचा अनुशेष तसेच पदोन्नतीतील वेतनगट-३ मध्ये ४ व वेतनगट-४ मध्ये ५ अशी एकूण ९ पदांचा अनुशेष दाखविण्यात आला आहे. साक्षीच्या वेळी अनुसूचित जमातीचा शिल्लक असलेला अनुशेष भरण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे असे आश्वासित केलेले आहे. त्यानुसार भरतीवरील बंदीचा कालावधी संपल्यावर परिमंडळ-यवतमाळ या कार्यालयाकडून अनुसूचित जमातीच्या वेतनगट -३ व वेतन गट ४ मध्ये सरळसेवेने व पदोन्नतीने भरावयाच्या एकूण ५९ पदांचा शिल्लक असलेला अनुशेष भरण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

(२) अनुसूचित जमातीच्या पदोन्नतीने भरावयाच्या वेतनगट-३ मध्ये ४ व वेतन गट ४ मध्ये ५ असे एकूण ९ पदांचा असलेला अनुशेष अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र वैधता झालेले कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे भरण्यात आलेला नाही. अनुसूचित जमातीच्या एकूण ९ कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या जात वैधता, प्रमाणपत्रानुसार त्यांना पदोन्नती दिली असल्यास पदोन्नतीने भरण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आंत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

तसेच असेही निदर्शनास आणण्यात येत आहे की, अनुसूचीत जमातीची सरळसेवेने किंवा पदोन्नतीने पदे भरतांना संबंधित उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय नियुक्ती वा पदोन्नती देऊ नये असा शासन निर्णय आहे त्यानुसार कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशीही समितीची शिफारस आहे.

(३) या कार्यालयात अनुसूचित जमातीच्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी सन १९९५ पूर्वीचे ६९ कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी अनुसूचित जमातीच्या २० कर्मचाऱ्यांनी अद्यापपर्यंत जात पडताळणीची कागदपत्रे कार्यालयात दाखल केलेली नाहीत. सन १९९५ पूर्वीच्या उमेदवारांना संरक्षण देण्यात आले आहे. परंतु शासनाने त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यास सूट दिलेली नाही. अनुसूचित जमातीच्या ज्या २० उमेदवारांनी कागदपत्रे सादर केली नाहीत. त्यांना नोटीस काढून कागदपत्र सादर करण्यासाठी दोन महिन्याची

मुदत देण्यात यावी व उक्त दिलेल्या मुदतीत उमेदवारांनी कागदपत्र सादर केले नाहीत तर त्यांना नोकरीवरुन कमी करण्यात यावे असे समितीने दिलेल्या निदेशानुसार कारवाई करण्यात यावी व  केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

(४) विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयात वर्ग ३ व ४ च्या पदांची भरती केंद्रीय पध्दतीने करण्यात येत असल्याने त्या त्या जिल्ह्यातील / तालुक्यातील उमेदवारांची भरती न होता अन्य जिल्ह्यातील उमेदवारांची भरती करण्यात आलेली आहे.  केंद्रीय भरती प्रक्रियेमुळे बीड - परळी येथील उमेदवारांची भरती न होता नागपूर, चंद्रपूर या भागातील उमेदवारांची भरती झालेली आहे. मोठ्या प्रमाणात भरती होत असतांना आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रातील दोन उमेदवार देखील भरती करीता आलेले नाहीत.  त्यामुळे त्या भागातील लोकांना न्याय मिळत नाही. महाजनकोच्या ऊर्जा निर्मिती प्लॅन्ट मध्ये केंद्रीय भरती प्रक्रिया करण्यास समितीचा विरोध नाही.  ती भरती प्रक्रिया आपण करु शकतो.  परंतु महाराष्ट्र विद्युत मंडळाची वितरण व पारेषणाची जी जिल्हानिहाय कार्यालये आहेत त्या ठिकाणी स्थानिक स्तरावरुन जाहिरात देवून भरतीची प्रक्रिया करणे शक्य आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यातील नामांकित दैनिक वर्तमान पत्रात  अनुसूचित जमातीच्या भरतीची जाहिरात देऊन जिल्हानिहाय भरती प्रक्रिया करण्यात यावी.  तसेच अनुसूचित जमातीचे आरक्षण जिल्हानिहाय वेगळे असल्याने जिल्हा पातळीवर परिक्षा घेण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी परिक्षा केंद्रे ठेवण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.  अशी समितीची शिफारस आहे.

(दोन) विद्युत वितरण कंपनी मार्फत अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना :

समितीने अनुसूचित जमातीकरीता व (सेवा व्यतिरिक्त) त्यांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना व अनुसूचित जमातीच्या उपभोक्त्यांसाठी उपलब्ध असलेल्या सवलती व योजना कोण-कोणत्या प्रकारे राबविण्यात आलेल्या आहेत अशी पृच्छा केली असता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित अंतर्गत अनुसूचित जमातीच्या उपभोक्त्यांसाठी खालीलप्रमाणे योजना राबविण्यात आली आहे.

१. घरगुती दिवे व पंखे वीज जोडणी :

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत अनुसूचित जमातीच्या उपभोक्त्यांना घरगुती दिवे व पंखे यासाठी जोडण्या देताना उपरी किंवा भूमिगत वीज पुरवठ्यांचा विस्तार करण्यासाठी त्यांच्याकडून सेवा जोडणी आकार घेतला जात नाही.

मागासवर्गीय आणि बिगर मागासवर्गीय अशा दोन्ही उपभोक्त्यांच्या रहिवासी असलेल्या अनेक मजली इमारती/संकुले यांच्याबाबतीत केवळ मागासवर्गीय उपभोक्त्यांना त्यांच्याकडील सेवा जोडणी आकाराच्या रक्कमेच्या प्रदानातून वगळण्यात येते. मागील तीन वर्षात अनुसूचित जमातीच्या उपभोक्त्यांना देण्यात आलेल्या घरगुती दिवे व पंखे यासाठी वीज देण्यात आलेली आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे :--

| वर्ष | घरगुती सेवा पुरवठ्या-साठी अनुसूचित जमातीचे अर्ज प्राप्त संख्या | अनुसूचित जमातीच्या अर्जदारांना वीज जोडणी दिलेली संख्या | अनुसूचित जमातीच्या अर्जदारांना प्रलंबित वीज जोडणी संख्या |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| २००६-०७ | ३९० | ३९० | ० |
| २००७-०८ | ७३६ | ७३६ | ० |
| २००८-०९ | ३८७ | ३८७ | ० |
| **एकूण . .** | **१५१३** | **१५१३** | **०** |

**२. अनुसूचित जमाती उपभोक्त्यांसाठी कृषी वीज पंप जोडणी योजना :**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागातर्फे १०० टक्के अनुदानित (सबसीडी) योजनेंतर्गत असलेल्या अनुसूचित जमातीच्या उपभोक्त्यांसाठी सेवा जोडणी आकार घेतला जात नाही. तसेच कृषी वीज पंप हे शासनातर्फे अनुदान स्वरुपात देण्यात येत असतात. त्यांना शेतीसाठी वीज पुरवठा देताना प्राधान्य देण्यात येते. मागील तीन वर्षात कृषी वीज पंप जोडण्या दिलेल्या उपभोक्त्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे :--

| वर्ष | वीज जोडणीसाठी अनुसूचित जमातीचे प्रलंबित अर्ज संख्या | अनुसूचित जमातीच्या अर्जदारांना एकूण दिलेली वीज जोडणी | अनुसूचित जमातीच्या अर्जदारांची वर्षअखेर प्रलंबित वीज जोडणी |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| २००६-०७ | १०५९ | २६८ | ७९१ |
| २००७-०८ | ७९१ | १०० | ६९१ |
| २००८-०९ | ६९१ | २२९ | ४६२ |
| **एकूण . .** | | ५९७ | |

समितीने अनुसूचित जमातीच्या लोकांच्या कल्याणासाठी जिल्ह्यातील आदिवासी पाडे, वस्त्या वगैरे या ठिकाणी कोणत्या योजना राबविल्या आहेत अशी पृच्छा केली असता अधिक्षक अभियंता यांनी यवतमाळ जिल्ह्यात १८६९ गावे आहेत. त्यातील ६५७ गावे ही आदिवासी उपयोजनेत समाविष्ट करण्यात आलेली आहेत त्यापैकी ५९४ गावांचे विद्युतीकरण करण्यात आलेले असून ६३ गावांचे विद्युतीकरण व्हावयाचे आहे. म्हणजेच गावातील १० टक्के घरांमध्ये वीज गेलेली असेल तर त्या गावाचे विद्युतीकरण झाले आहे असे मानले जाते अशी समितीला माहिती दिली. गावांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे म्हणजे नेमके आपण काय केले आहे, गावापर्यंत वीज दिलेली आहे की, गावातील आदिवासींच्या घरामध्ये प्रत्यक्ष वीज दिली आहे अशी समितीने विचारणा केली असता मुख्य अभियंता यांनी जिल्ह्यात एकूण **२३७ आदिवासी पाडे असून त्यापैकी ३० पाड्यांचे विद्युतीकरण व्हायचे आहे.** विद्युतीकरण बाकी असलेल्या गावांचा आणि पाड्यांचा समावेश राजीव गांधी विद्युतीकरण योजनेंतर्गत करण्यात आला आहे. **राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेतून यवतमाळ जिल्ह्यासाठी २५.१७ कोटी रुपये मंजूर झालेले आहेत आणि त्यातून एकूण २६२ गावांचे विद्युतीकरण करण्याचे काम प्रस्तावित केलेले आहे,** असे समितीला सांगितले. समितीने ज्या ज्या ठिकाणी वीज कनेक्शनची सोय अजून झालेली नाही आणि ज्यांना वीज द्यायची आहे त्या त्या ठिकाणी पत्रके काढून ग्रामसेवकांमार्फत आदिवासींची नावे घेण्यात यावी जेणे-करुन ही योजना चांगल्या प्रकारे राबविली जाईल.

राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेच्या बाबतीत या जिल्ह्यांसाठी किती इष्टांक दिलेला आहे त्याबाबत सर्व्हे केलेला आहे काय, यासंदर्भात सद्य:स्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य अभियंता यांनी राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजने अंतर्गत २५ कोटी १७ लाख रुपयांची योजना मंजूर करुन घेतलेली आहे. त्यामध्ये २६२ गावांचा समावेश आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकांना विद्युत कनेक्शन देण्याच्या संदर्भात ही योजना आहे. या योजनेंतर्गत एकूण ७८,७०५ लोकांना विद्युत कनेक्शन द्यावयाचे आहेत. त्यासाठी ११ के.व्ही.ची १३७ कि.मी. वाहिनी, एल.टी.ची १६५ कि.मी. वाहिनी व २७५ वितरण ट्रान्सफॉर्मर्स बसवावे लागणार आहेत. या योजनेअंतर्गत कामाची निविदा मुख्य कार्यालयात मंजूर झालेली असून मे. आय.सी.एस.ए. (इंडिया), हैद्राबाद या कंपनीला कामाचे कंत्राट दिले आहे. वीज जोडणी देण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

या योजनेअंतर्गत जुलै, २००९ अखेर ४१,५६७ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झालेले आहे. त्यापैकी ४९८६ लाभार्थ्यांना विद्युत पुरवठा करण्यात आला आहे. उक्त प्राप्त झालेल्या अर्जांपैकी अनूसूचित जमातीचे ५०९५ अर्ज प्राप्त झालेले असून त्यात अनुसूचित जमातीचे ७३३ लाभार्थी आहेत. उर्वरित ४३६२ लाभार्थ्यांना विद्युत पुरवठा देण्याचे काम प्रगतिपथावर आहे. या योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांवर १६.१३ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. ही योजना सध्या प्राथमिक

अवस्थेमध्ये असून या योजनेचा एकूण कालावधी दीड वर्षाचा आहे. त्या कालावधीत लाभार्थ्यांची यादी तयार करण्याची कामे सुरु करण्यात येतील अशी समितीला माहिती दिली. अनुसूचित जमातीच्या साडेचार हजार लाभार्थ्यांना विद्युत कनेक्शन द्यावयाचे आहे. त्यांना कनेक्शन कसे देता येईल यादृष्टीने युध्द पातळीवर प्रयत्न करावे असे समितीने निदेश दिले.

तसेच आदिवासी गावकऱ्यांना आणि शेतकऱ्यांना पाण्याची सोय करुन द्यायची म्हटले तरी त्यासाठी त्यांना वीज कनेक्शन देणे गरजेचे आहे. शेतीपंपाला वीज देताना आदिवासींच्या बाबतीत सहानुभूतीने विचार करुन अग्रक्रमाने त्यांना वीज कनेक्शन देण्याच्या दृष्टीने कारवाई केली पाहिजे. म्हणजे याबाबतीत ४ विद्युत पोल देण्याचे निकष आहेत, परंतु अशा निकषांमुळे आदिवासींना वीज कनेक्शन मिळण्यात अडचण होते. त्यांना सहजतेने वीज कनेक्शन मिळू शकत नाही. या कार्यालयाकडे एका आदिवासीच्या वीज पंपाला वीज कनेक्शन देण्यासाठी किती अर्ज प्रलंबित आहेत अशी समितीने पृच्छा केली, त्यावर मुख्य अभियंता यांनी वीज कनेक्शन देणेबाबत डीपीडीसीकडून खास निधी दिला जातो तो आम्ही १०० टक्के वापरलेला आहे, त्यामुळेच सध्या आदिवासी शेतकऱ्यांची कोणतीही प्रकरणे प्रलंबित नाहीत. जी आदिवासींची ४५५ प्रकरणे प्रलंबित आहेत ती त्यांनी कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे प्रलंबित आहेत. ह्या योजनेंतर्गत असलेल्या अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांकडून सेवा जोडणी आकार आपण घेत नाही. तसेच कृषी वीज पंप हे शासनामार्फत अनुदान स्वरुपात देण्यातं येत असल्याने त्यांना शेतीसाठी वीज पुरवठा देतानाही प्राधान्याने देण्यात येतो. गेल्या तीन वर्षात आपण ५९७ अनुसूचित जमातीच्या अर्जदारांना वीज जोडणी दिलेली आहे. त्याशिवाय १६६ प्रकरणे अशी आहेत की, त्याचे टीआर अपेक्षित आहे तर काही प्रकरणांमध्ये लाभार्थ्यांची नावे आपल्याकडे आली आहेत पण त्यांचा राहण्याचा पत्ता सापडत नाही. त्यामुळे ती प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत. तेव्हा या सर्व प्रकरणामध्ये संबंधित खात्याने आम्हाला सदरहू इच्छुक लाभार्थ्यांची माहिती प्राप्त करुन द्यावी अशी अपेक्षा आहे. असे समितीला सांगितले असता अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती यांनी ही योजना आदिवासी विकास महामंडळामार्फत राबवली जाते, प्रकल्प अधिकारी यांच्याकडून लाभार्थ्यांची नावे घेऊन प्रकल्प अधिकारी आणि विद्युत मंडळाचे अधिकारी यांनी एकत्रित बैठक घेऊन ही पूर्तता करावी. असे समितीला सांगितले. समितीने प्रकल्प अधिकाऱ्यांनी त्यांना यादी द्यावी, जे ८१ लोक आहेत त्यांना प्राधान्य द्यावे. प्रकल्प अधिकारी आणि विद्युत मंडळाचे अधिकारी यांनी एकत्र बसून याबाबत आढावा घ्यावा आणि शेती पंपाला कनेक्शन देण्याची कार्यवाही करावी.

शेती पंपाच्या संदर्भात जिल्हा परिषदेची सुध्दा अशीच योजना आहे. आपण शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ देण्याचा प्रयत्न करावा. विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांकडून ए-१, फॉर्म भरुन घेऊन उपविभागीय कार्यालयाकडे दिले पाहिजेत. तसेच जी प्रकरणे मंजूर केलेली आहेत आणि

ज्यांच्या बाबतीत "डिमांड नोटीस" दिलेली आहे. त्यांचे पेमेंट खात्रीपूर्वक करावे अशी समितीने सूचना केली असता अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती यांनी पूर्वी प्रकल्प अधिकाऱ्यामार्फत पैसे दिले जात होते. आता ही पध्दत बदलेली आहे. उक्त एमएसईबीच्या वेगवेगळ्या कंपन्या झाल्यामुळे पूर्वीच्या पध्दतीने पैसे दिले जात नाहीत. एमएसईबीला द्यावयाचे पैसे आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडे डी.डी.फॉर्ममध्ये असतात. ते पैसे एमएसईबीने मागच्या वर्षी केलेल्या कामाचा खर्च लक्षात घेऊन त्यांनी मागणी केल्यानंतर आदिवासी विकास आयुक्त यांच्याकडून देण्यात येतात. उदा. २००८-०९ मध्ये जे काम केले असेल किंवा जो खर्च केला असेल त्याचा रिपोर्ट आल्यानंतर २००९-२०१० चे पैसे वितरित केले जातात अशी समितीला माहिती दिली.

समितीने आदिवासी विकास महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांनी आणि महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रित बसून जी यादी दिलेली आहे त्याची तपासणी करावी. जे लोक सापडत नाहीत किंवा बोगस नावे असतील तर ते बघावे तसेच पैसे देण्याच्या बाबतीत जी नवीन पध्दत केलेली आहे ती समजावून सांगावी. मागच्या वर्षाचा किती खर्च होता याचा अहवाल आयुक्त, आदिवासी विकास यांच्या कार्यालयाकडे पाठवावा. याबाबत अपर आयुक्तांनी सुध्दा समन्वय करावे. असे समितीने सुचित केले असता मुख्य अभियंता, विद्युत वितरण कंपनी यांनी याबाबत प्रकल्प कार्यालयाने आम्हाला सहकार्य **केल्यास ८१ लोकांच्या बाबतीत प्राधान्य देऊन पुढाकार घेण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.**

साक्षीच्या वेळी दिलेल्या माहितीनुसार अनुसूचित जमातीच्या लोकांच्या कल्याणासाठी जिल्ह्यातील आदिवासी पाडे, वस्त्या येथे राबविण्यात आलेल्या योजनांबाबत पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली.

यवतमाळ जिल्ह्यात एकूण १८६९ शहरे व गावे आहेत. त्यापैकी ६५७ गावे आदिवासी उपयोजनेत समाविष्ट आहेत. त्यातील ५९४ गावाचे विद्युतीकरण करण्यात आले आहेत. उर्वरित ६३ गावाचे विद्युतीकरण राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत करण्यात येत आहे. राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेला फार मापक प्रमाणात विविध मार्गाने प्रसिध्दी देऊन पात्र लाभार्थीपर्यंत त्या योजनेचे फायदे पोहचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. या योजनेअंतर्गत आजपर्यंत २७,४२८ लाभार्थी यांना विद्युत पुरवठा देण्यात आला आहे. शेती पंपासाठी विद्युत पुरवठा

पुरविण्यासाठी आदिवासी विभागाकडून आदिवासी लोकांना १०० % निधी देण्यात येतो. आदिवासीच्या पात्र लाभार्थी यांना वर्षनिहाय खालीलप्रमाणे शेती वीज पुरवठा करण्यात आले आहे :-

| वर्ष (१) | शेती वीज पुरवठा देण्यात आलेले आदिवासींची संख्या (२) |
|---|---|
| २००५-२००६ | १४९ |
| २००६-२००७ | १५५ |
| २००७-२००८ | २३२ |
| २००८-२००९ | १४६ |
| २००९-२०१० | १९५ |
| **एकूण** | ८७७ |

या योजनेअंतर्गत सन २००५-२००६ ते २००९-२०१० या कालावधीत एकूण ८७७ आदिवासी लाभार्थ्यांपैकी आजपर्यंत ६२६ पात्र लाभार्थी यांना शेती वीज पुरवठा करण्यात आला आहे. प्रलंबित असलेल्या २५१ प्रकरणांबाबत आदिवासी विभागाकडून आवश्यक पूर्तता झाल्यावर त्वरित वीज पुरवठा करण्यासाठी संबंधित कार्यालय / अधिकारी यांच्याशी पाठपुरावा करण्यात येत आहे.

आदिवासी लोकसंख्येची ६५ गावे आहेत या गावांतील किती आदिवासी लोकांना शेती पंपासाठी विद्युत पुरवठा देण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे. वीज कनेक्शन मिळावे म्हणून किती लोकांनी अर्ज केले आहेत. त्यापैकी किती लोकांना वीजेचे कनेक्शन दिले व किती अर्ज प्रलंबित आहेत अशी समितीने विचारणा केली असता अधिक्षक अभियंता यांनी या योजनेसाठी १०० टक्के सबसिडी शासनाकडून देण्यात येते ६२६ पात्र लाभार्थ्यांना शेतीसाठी वीज पुरवठा करण्यात आलेला आहे. सर्वच आदिवासी लोकांना ही योजना लागू आहे. एकही अर्ज प्रलंबित नाही. प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मदतीने ही योजना राबविण्यात येते. यामध्ये ८१ लोकांनी ए-१ फॉर्मस भरलेले नाहीत. १०४ प्रकरणे टेस्ट रिपोर्ट न मिळालेली आहेत. १०१ प्रकरणी मागणीपत्र येऊनही प्रकल्प अधिकाऱ्यांनी कोटेशन्स भरलेली नाहीत.

आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंप देण्याची योजना तीन वर्षापूर्वीच लोडशेडिंगमुळे बंद करण्यात आली आहे. २२ आदिवासी शेतकऱ्यांसाठी विजेचे पंप देण्यासाठी विद्युत पोल उभे केलेले आहेत. विद्युत पंपाऐवजी ऑईल पंप आणि डिझेल पंप देण्याचे प्रस्तावित आहे असे प्रकल्प अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे, ही बाब विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी निदर्शनास आणली असता

विजेच्या टंचाईमुळे डिझेलच्या पंपावर आदिवासी शेतकऱ्यांचा विकास होणार आहे काय, आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंप देण्याची योजना सुरु असतांना या योजनेंतर्गत यवतमाळ जिल्ह्यात १०१ प्रकरणांमध्ये प्रकल्प अधिकाऱ्यांनी लाभार्थीकडून कोटेशन्स भरलेली नाहीत. ८१ शेतकऱ्यांकडून ए-१ फॉर्म भरुन घेतले नाहीत. टेस्ट रिपोर्टची १०४ प्रकरणे प्रलंबित आहेत. एखाद्या कंपनीला एका शेतकऱ्यामागे ४०० रुपये दिले तर, ती कंपनी अशा योजनांची कामे तातडीने हाती घेऊ शकेल, समितीची अशी सूचना आहे की, **टेस्ट रिपोर्ट वगळून १०४ शेतकऱ्यांना तातडीने कनेक्शन देण्यात यावे** तसेच सातपुडा डोंगरातील दुर्गम भागात २२ आदिवासी शेतकऱ्यांना सांगण्यात आले आहे की, ही योजना बंद झालेली आहे. आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंप देण्याची योजना बंद झाली नसेल तर, तातडीने डिमांड नोट काढण्यात यावी. डोंगराच्या सहाव्या पायथ्यापर्यंत विजेचे पोल टाकलेले आहेत त्यामुळे त्या शेतकऱ्यांना तातडीने कनेक्शन कसे देता येईल, याकडे विशेष लक्ष देऊन तेथील काम पूर्ण करण्यात यावे असे समितीने निदेश दिले असता सचिव, ऊर्जा विभाग यांनी या बाबीसंबंधी आदिवासी विकास विभागाचे सचिव व प्रकल्प अधिकारी यांची एक संयुक्त बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

या प्रकरणी प्रकल्प अधिकाऱ्यांचे या योजनेकडे लक्ष नाही. आदिवासी विकास विभागाने थेट पैसे महावितरण कंपनीकडे वर्ग करणे जरुरीचे आहे. महावितरण कंपनीकडून तातडीने मोटारी खरेदी करण्यात येऊन त्याचा लाभ आदिवासी बांधवाना मिळू शकेल. आदिवासी विकास विभागाकडून थेट महावितरण कंपनीला पैसे देता येतील काय, याबाबत ऊर्जा सचिव यांनी लक्ष घालावे. आदिवासीच्या प्रलंबित प्रकरणांची एक यादी तयार करावी. वीजेचे कनेक्शन्स आणि मोटार पंप महावितरण कंपनीनेच बसवून द्यावयाचे आहे. ही कंपनी एक किंवा जास्तीत जास्त तीन महिन्यात हे काम पूर्ण करु शकेल. त्यामुळे राज्यातील आदिवासी बांधवांची प्रलंबित यादी तात्काळ निकाली निघू शकेल. आदिवासी विकास विभागाचे पैसे ठक्कर बापा योजनेकडे वळविण्यात येतात जर हे पैसे आदिवासी बांधवांसाठी खर्च केले तर त्यांना लाभदायक होईल. बारा कोटी रुपयांमध्ये आदिवासी शेतकऱ्यांना वीजेचे कनेक्शन्स देता आले असते. टीएसपी योजनेमध्ये केंद्र सरकारकडून निधी येतो. आदिवासी विकास विभागाकडून १०० कोटी रुपयांचा निधी खर्चा अभावी परत केला जातो. परंतु या विभागाच्या योजना मात्र प्रलंबित राहतात हे संयुक्तीक वाटत नाही.

विद्युत पंप बसविण्याचे काम महावितरण कंपनीला दिले तर ती कंपनी अतिशय चांगल्या प्रकारे ही योजना अंमलात आणू शकेल. आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंप देण्याची एक चांगली योजना आहे. यवतमाळ जिल्ह्यात ६५७ गावांमध्ये ३८७ प्रकरणे प्रलंबित आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुका टीएसपीमध्ये येत असून त्या तालुक्यात ८७ लाख लोकसंख्या आहे. अधिक्षक

अभियंता यांनी महावितरण कंपनीला काम दिले तर लाभार्थ्याला मोटार मिळाली नाही किंवा इतर गोष्टी मिळाल्या नाहीत असे होणार नाही. महावितरण कंपनीकडून ही कामे झाली नाही तर संबंधित उप अभियंता, लाईनमन यांच्यावर कारवाई करता येईल असे समितीला सांगितले.

समितीने महावितरण कंपनीला भेट दिल्यानंतर आदिवासींना वीज कनेक्शन आणि मोटारपंपासाठी १०० टक्के अनुदानाची योजना प्रभावीपणे कार्यान्वित होत नसल्याचे निदर्शनास आले. काही ठिकाणी प्रकल्प अधिकारी असे सांगतात की, ही योजना बंद होऊन आता डिझेल इंजिन देण्याची योजना सुरु झालेली आहे अशी समितीने विचारणा केली. विभागीय सचिव यांनी यापूर्वी आदिवासींना मोटार आणि ऑईल इंजिन देत होतो. परंतु कनेक्शन न मिळालेल्या पंपाची संख्या २० हजारावर आहे. महावितरण कंपनीकडे वीजेचा तुटवडा आहे. त्यामुळे जेवढ्या पंपाना कनेक्शन द्यायला पाहिजे तेवढ्या पंपाना ते देता येत नाही म्हणून असा निर्णय घेण्यात आलेला आहे की, जो पर्यंत जुनी प्रलंबित असलेली वीज कनेक्शन्स संपत नाहीत तोपर्यंत नवीन कनेक्शन्स देऊ नयेत. नंदूरबार जिल्ह्यातील मतदारसंघांमध्ये ३३ के.व्ही. ची प्रत्येकी दोन अशी एकूण चार सबस्टेशन उभारण्यात आलेली आहेत. ही सबस्टेशन्स कोणत्या निधीतून उभारण्यात आली आहे अशी विचारणा केली असता ही कामे आदिवासी विकास विभागाच्या पैशातून उभारण्यात आल्याचे समितीला सांगण्यात आले. एका सबस्टेशन्ससाठी बारा ते साडेबारा कोटी रुपये खर्च अपेक्षित धरला तर ४ सबस्टेशन्ससाठी ५० कोटी रुपये आदिवासी विकास विभागाच्या बजेटमधून खर्च झालेले आहेत. हे पैसे कनेक्शन्ससाठी वापरले असते तर किती तरी आदिवासींना वीज कनेक्शन मिळाले असते. आदिवासी विकास विभागाने आदिवासींना मोटारपंप देणे सुरु केले. परंतु एमएसईबीने विहित मुदतीत वीज कनेक्शन दिले नाही. **परिणामी वीज कनेक्शनची मागणी वाढली. वीज कनेक्शनचे टारगेट वाढवून ते विहीत मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना एमएसईबीला द्यावयास पाहिजे.** सन २००२ पासूनचे मोटारपंप वीज कनेक्शन अभावी बंद पडून आहेत असे समितीने मत व्यक्त केले. विभागीय सचिव यांनी आदिवासींना कनेक्शन देण्यासाठी जेवढा खर्च येतो तेवढा खर्च आदिवासी विकास विभागाकडून देण्यात येतो. वीज कनेक्शन्ससाठी जर ५ विद्युत पोल टाकावे लागत असतील आणि त्यासाठी १५ हजार रुपये लागत असतील तर ते पैसेही देण्यात येतात. वीज कनेक्शन्ससाठी पैसे भरलेले आहेत. परंतु वीजेचा तुटवडा असल्यामुळे नवीन वीज कनेक्शन्स देता येत नाहीत.

**अभिप्राय व शिफारशी :**

**(१) यवतमाळ जिल्ह्यात एकूण १८६९ गावे आहेत त्यापैकी ६५७ गावे आदिवासी उपाययोजनेत समाविष्ट आहेत. त्यातील ५९४ गावांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे. उर्वरित ६३ गावांचे विद्युतीकरण राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत करण्यात**

येत आहे तसेच विद्युतीकरण अभावी असलेल्या २०७ आदिवासी पाड्याचा समावेश राजीव गांधी विद्युतीकरण योजनेअंतर्गत करण्यात आला आहे. राजीव गांधी विद्युतीकरण योजनेतून यवतमाळ जिल्ह्यासाठी २५.१७ कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले आहे. उक्त निधीतून २६२ गावांचे विद्युतीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच दारिद्रय रेषेखालील लोकांना विद्युत जोडणी देण्याच्या संदर्भात ही योजना तयार करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत एकूण ७८,७०५ लाभार्थ्यांना विद्युत कनेक्शन द्यावयाचे आहेत. आजपर्यंत २७,४२८ लाभार्थी यांना विद्युत पुरवठा देण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीचे ५०९५ अर्ज प्राप्त झाले त्यापैकी ७३३ अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना विद्युत पुरवठा देण्यात आला आहे. उर्वरित ४३६२ लाभार्थ्यांना विद्युत पुरवठा देण्याचे काम प्रगती पथावर आहे. अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांना प्रथम वीज पुरवठा करण्यात यावा या दृष्टिने युध्द पातळीवर प्रयत्न करण्यात यावे असे समितीने दिलेल्या निदेशान्वये यवतमाळ परिमंडळ अंतर्गत विद्युत वितरण कंपनीने आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील विद्युत पुरवठा अभावी शिल्लक असलेल्या अनुसूचीत जमातीतील ४३६२ लाभार्थ्यांपैकी किती लाभार्थ्यांना विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे. किती लाभार्थीना विद्युत पुरवठा होण्याचे शिल्लक आहे याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

(२) आदिवासी गावातील शेतकऱ्यांना पाण्याची सोय व्हावी या हेतूने शेती पंपाला वीज देताना आदिवासी जमातीच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. वीज पुरवठा करतांना ४ विद्युत पोल देण्याचे जे निकष आहेत त्यात शिथिलता आणणे गरजेचे आहे. अशा निकषांमुळे आदिवासींना वीज कनेक्शन मिळण्यास अडचण होते. शेती पंपासाठी विद्युत पुरवठा करण्यात येत असुन सन २००५-२००६ ते सन २००९-२०१० या कालावधीत एकूण ८७७ लाभार्थ्यांना शेती विद्युत पुरवठा करण्यात आला असल्याचे आकडेवारीवरुन दिसुन येते परंतु आजपर्यंत ६२६ पात्र आदिवासी लाभार्थ्यांना शेतीसाठी वीज पुरवठा करण्यात आला आहे असे निदर्शनास आलेले असल्याने उर्वरित २५१ आदिवासी लाभार्थ्यांना शेतीसाठी विज पुरवठा करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

(३) आदिवासींची काही प्रकरणे कागदपत्राची पूर्तता न केल्यामुळे प्रलंबित आहेत. त्यामध्ये १६६ प्रकरणे टीआर मुळे प्रलंबित आहे. तर काही प्रकरणांमध्ये लाभार्थ्यांचा पत्ता सापडत नाही. या प्रकरणी प्रकल्प अधिकारी यांनी ८१ शेतकऱ्यांचे ए-१ फार्म भरुन घेऊन उपविभागीय कार्यालयाकडे पाठविण्याची कार्यवाही करावी. यवतमाळ जिल्ह्यात

१०१ प्रकरणामध्ये प्रकल्प अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांकडून कोटेशन्स भरुन न घेतल्यामुळे प्रकरणे प्रलंबित आहेत. अशा प्रकरणी प्रकल्प अधिकारी यांनी संबंधित लाभार्थ्यांकडून कोटेशन्स भरुन त्वरीत कारवाई करावी तसेच विद्युत मिटरच्या टेस्ट रिपोर्ट अभावी १०४ प्रकरणे प्रलंबित आहेत. या प्रकरणी टेस्ट रिपोर्ट वगळून १०४ शेतकऱ्यांना तातडीने वीज पुरवठा करण्याची कार्यवाही करावी. ही योजना आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविली जात असल्याने प्रकल्प अधिकारी आणि विद्युत मंडळाचे अधिकारी यांची एकत्रित बैठक घेऊन प्रलंबित असलेल्या उक्त प्रकरणी त्वरीत कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.

(४) सातपुडा भागातील दुर्गम भागात २२ आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंप देण्याची योजना बंद झाली नसेल तर याप्रकरणी तातडीने डिमांड नोट काढून तेथील आदिवासी शेतकऱ्यांना वीज पुरवठा होण्याच्या दृष्टीने शासनाच्या संबंधित विभागाने विशेष लक्ष देवून तेथील आदिवासी भागातील शेतकऱ्यांना विद्युत पंप देणेबाबत त्वरित कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

(५) समितीने महावितरण कंपनीला भेट दिल्यानंतर आदिवासींना वीज कनेक्शन आणि मोटारपंपासाठी १००% अनुदानाची योजना प्रभावीपणे कार्यान्वित होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागाने विद्युत महावितरण कंपनीकडे निधी वर्ग केल्यास महावितरण कंपनीकडून तातडीने मोटारपंप खरेदी करण्यात येतील. वीजेचे कनेक्शन्स आणि मोटार पंप महावितरण कंपनीकडून बसवून घेतल्यास आदिवासी शेतकऱ्यांना त्याचा लाभ त्वरीत मिळू शकेल. आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंप देण्याची ही एक चांगली योजना असल्याने महावितरण कंपनीला विद्युत पंप बसविण्याचे काम दिले तर ही योजना अतिशय चांगल्या प्रकारे अंमलात येऊ शकेल. यवतमाळ जिल्ह्यात ६५७ गावांमध्ये ३८७ प्रकरणे या योजनेमुळे प्रलंबित आहेत. प्रकल्प अधिकारी पांढरकवडा क्षेत्राअंतर्गत सन १९९१ च्या जनगणनेनुसार ८७ हजार आदिवासींची लोकसंख्या होती व सन २००१ च्या जनगणनेनुसार ४ लक्ष ७३ हजार ऐवढी आदिवासींची लोकसंख्या आहे. या प्रकल्पातंर्गत सन २००२ पासुन मोटारपंप वीज कनेक्शन अभावी बंद पडून आहेत. आदिवासी विकास विभागाने आदिवासींना मोटारपंप दिले परंतु विद्युत वितरण कंपनीने विहित मुदतीत वीज कनेक्शन दिलेले नसल्याने विजेची मागणी वाढली. वीज कनेक्शनचे टारगेट वाढवून ज्या लाभार्थ्यांना मोटार पंप दिले आहे अशा लाभार्थ्यांचे वीज कनेक्शन जोडणीचे काम पूर्ण करण्याच्या सूचना विद्युत वितरण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने देण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

**समितीने वरीलप्रमाणे नमुद केलेल्या शिफारशींवर महावितरण कंपनीच्या परिमंडळ कार्यालयाने व संबंधित विभागाने तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

तसेच असेही निदर्शनास आणण्यात येते की, आमदार निधीमधील कामे पूर्ण केले नाही अशा प्रकारची गंभीर तक्रार समितीला प्राप्त झाली आहे. लोकप्रतिनिधी आमदार निधीचे पैसे देतात परंतु दोन तीन वर्षे काम होत नाही. एस्टिमेट नसल्यामुळे सगळी कामे पडून आहेत. त्यामुळे आदिवासी गावांमध्ये वीज पुरवठा होत नाही असे समितीने सुचित केले असता अधिक्षक अभियंता यांनी **आमदार निधीतुन घेण्यात आलेल्या कामामध्ये उशीर झाला आहे याबाबत झोनल ऑफीसला सूचना केली आहे, आदिवासी गावातील कामे लवकर सुरु करण्यात येतील असे समितीला आश्वासित केले. उक्त प्रमाणे समितीला दिलेल्या आश्वासनानुसार आमदार निधीतून घेण्यात आलेली कामे पूर्ण झाल्याचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

नाशिक जिल्ह्यामध्ये ज्या ज्या आदिवासी शेतकऱ्यांनी विद्युत पंपाची मागणी केलेली आहे त्या त्या आदिवासी शेतकऱ्यांना तातडीने वीजेचे कनेक्शन आणि मोटारी द्यायला हव्यात असे समितीचे मत आहे. नाशिक जिल्ह्यात त्र्यंबक तालुक्यामध्ये ७२ खेड्यांमध्ये अजूनही वीज पोहोचलेली नाही. महावितरणच्या शाखा अभियंता यांनी असे उत्तर दिले की, तेथे जाणे शक्यच नाही. ७२ खेड्यांमध्ये रात्रीसाठी सौर ऊर्जेचे दिवे देण्याबाबत प्रस्तावित करण्यात येते, या ७२ खेड्यांमध्ये विजेचे कनेक्शन्स नाही त्यामुळे तेथील आदिवासी बांधवाचा विकास होणार नसल्याचे समितीचे ठाम मत झालेले आहे. या प्रकरणी समितीने आपल्या तिसऱ्या अहवालात सुध्दा याबाबत शिफारस केलेली आहे.

तसेच नाशिक जिल्ह्यामध्ये हार्सूलचा जो पट्टा आहे त्यासाठी सहा कोटी रुपयांचे एस्टिमेट केलेले आहे. त्या ठिकाणी ही रक्कम खर्च करुन तेथे काम करता येणे शक्य आहे. नाशिक विभागात १०० टक्के लोक आदिवासी आहेत. आदिवासी विकास विभागाचा निधी अशा ठिकाणी खर्च केल्यास त्याचा अधिक चांगला उपयोग होऊ शकेल. नाशिक जिल्ह्यातील पेठ, हरसूल व सुरगणा या तालुक्यामधील वीजेचे काम करण्याकरिता महावितरण कंपनीने योजना तयार करावी व या तालुक्यातील आदिवासी लोकांना वीज उपलब्ध होण्याच्या दृष्टीने त्वरीत कारवाई करावी अशी समितीची सूचना आहे.

अभिप्राय व शिफारशी :

त्र्यंबक तालुक्यातील (जि.नाशिक) हरसुल या गावाअंतर्गत ७२ खेड्यांमध्ये महावितरण कंपनीच्या अभियंता यांना त्या ठिकाणी जाणे शक्य होत नसल्याने तेथील आदिवासी लोकांना अद्यापपर्यंत वीज पुरवठा देण्यात आलेला नाही त्यामुळे आदिवासी लोकांचा विकास होऊ शकत नाही. याबाबत समितीने आपल्या तिसरा अहवालात केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने नाशिक जिल्ह्यातील हरसुल गावाअंतर्गत (ता. त्र्यंबक) विद्युतीकरण न झालेल्या ७२ आदिवासी पाड्यांपैकी, १४ आदिवासी पाड्यांचे विद्युतीकरण आदिवासी उपयोजना (जिल्हास्तर DPDC) योजनेमध्ये, ११ आदिवासी पाड्यांचे विद्युतीकरण राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेमध्ये व १९ आदिवासी पाड्यांचे विद्युतीकरण मेडा मार्फत अपारंपारिक पध्दतीने करण्यात येणार आहे. उर्वरित आदिवासी पाड्यांचे विद्युतीकरण नवीन योजना तयार करुन सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजुरीनंतर लवकरच शासनास सादर करण्यात येईल अशा प्रकारे समितीच्या तिसऱ्या अहवालात करण्यात आलेल्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने उक्त योजनेनुसार ७२ आदिवासी पाड्यातील विद्युतीकरण करण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला पाठविण्यात यावी अशी समिती पुन्हा शिफारस करीत आहे.

नाशिक जिल्ह्यातील पेठ, हरसुल व सुरगाणा या तालुक्यामधील वीजेचे काम करण्याकरिता महावितरण कंपनीमार्फत वीज कनेक्शन देण्याची योजना तयार करुन योग्य ती कारवाई करण्यात यावी. तसेच जिल्ह्यातील किती आदिवासी शेतकऱ्यांनी विद्युत पंपाची मागणी केलेली आहे त्यापैकी किती आदिवासी शेतकऱ्यांना वीजेचे कनेक्शन आणि मोटारी देण्यात आलेल्या आहेत. या प्रकरणी आढावा घेऊन कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

औरंगाबाद परिमंडळ :

(तीन) अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी वर्गाचा शिल्लक असलेला अनुशेष :

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित परिमंडळ औरंगाबाद या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादींचा आढावा घेण्यासाठी दिनांक २८ जुलै, २००९ रोजी औरंगाबाद-परिमंडळ येथील कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीच्या वेळी समितीला औरंगाबाद विभागातील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ विभागामध्ये वेतन गट - १ व २ मधील पदे मुख्य कार्यालयाकडून भरली जातात. वर्ग ३ व ४ मधील

तांत्रिक/अतांत्रिक वर्गाची एकूण किती पदे मंजूर आहेत. मंजूर पदांपैकी संवर्गनिहाय तांत्रिक/अतांत्रिक वर्गातील प्रत्येकी किती पदे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यांत आली आहेत व त्यापैकी किती व कोणकोणती पदे भरण्यांत आली आहेत. याबाबतच्या माहितीचा तपशिल समितीला खालीलप्रमाणे सादर करण्यात आला.

**मंजूर पदे**

| वेतनगट | वेतनगट-३ | | वेतनगट-४ | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| पदाचा संवर्ग | मंजूर | भरलेली | मंजूर | भरलेली | मंजूर | भरलेली |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| तांत्रिक | ४९३ | २६२ | १०८१ | ८८१ | १५७४ | ११४३ |
| अतांत्रिक | ४४७ | २९८ | ६६ | ४७ | ५१३ | ३४५ |
| **एकूण . .** | **९४०** | **५६०** | **११४७** | **९२८** | **२०८७** | **१४८८** |

**संवर्गनिहाय मंजूर व भरलेली पदे प्रपत्र-७ प्रमाणे**

**अनुसूचित जमातीची सरळसेवेने भरलेली पदे**

| वेतनगट | वेतनगट-३ | | वेतनगट-४ | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| पदाचा संवर्ग | राखीव | भरलेली | राखीव | भरलेली | राखीव | भरलेली |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| तांत्रिक | १७ | १० | ४५ | ४१ | ६२ | ५१ |
| अतांत्रिक | २५ | १० | ०७ | ०१ | ३२ | ११ |
| **एकूण . .** | **४२** | **२०** | **५२** | **४२** | **९४** | **६२** |

**अनुसूचित जमातीचे पदोन्नतीने भरलेली पदे**

| वेतनगट | वेतनगट-३ | | वेतनगट-४ | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| पदाचा संवर्ग | राखीव | भरलेली | राखीव | भरलेली | राखीव | भरलेली |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| तांत्रिक | १९ | १२ | ३१ | २७ | ५० | ३९ |
| अतांत्रिक | ०७ | ०४ | ० | ० | ०७ | ०४ |
| **एकूण . .** | **२६** | **१६** | **३१** | **२७** | **५७** | **४३** |

**अनुसूचित जमातीचा सरळ सेवेचा अनुशेष**

| पदाचा संवर्ग | वेतनगट-३ | वेतनगट-४ | एकूण |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| तांत्रिक | ०७ | ०४ | ११ |
| अतांत्रिक | १५ | ०६ | २१ |
| **एकूण . .** | **२२** | **१०** | **३२** |

**अनुसूचित जमातीचा पदोन्नतीचा अनुशेष**

| पदाचा संवर्ग | वेतनगट-३ | वेतनगट-४ | एकूण |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| तांत्रिक | ०७ | ०४ | ११ |
| अतांत्रिक | ०३ | ०० | ०३ |
| **एकूण . .** | **१०** | **०४** | **१४** |

**संवर्गनिहाय अनुसूचित जमातीची भरण्यात आलेली पदे व अनुशेष प्रपत्र-८ प्रमाणे**

१. सन २००० ते २००८ पर्यंत नियामक आयोगाच्या आदेशानुसार सरळसेवा भरतीवर बंदी असल्यामुळे सरळसेवेने भरावयाचा अनु.जमातीचा अनुशेष पूर्णपणे भरता आला नाही.

२. पदोन्नतीने भरावयाचा अनु.जमातीचा अनुशेष पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे भरता आला नाही.

औरंगाबाद विभागातील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ विभागामध्ये वर्ग १ ते ४ मधील तांत्रिक/अतांत्रिक वाहक/चालक इत्यादींची एकूण किती पदे मंजूर आहेत त्यापैकी डिसेंबर २००८ अखेर प्रत्यक्षात वर्गनिहाय किती पदे भरण्यात आली आहेत मंजूर पदांपैकी संवर्गनिहाय प्रत्येकी किती पदे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत त्यापैकी किती व कोणकोणती पदे भरण्यात आलेली आहेत व उर्वरित पदे रिक्त राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली. मुख्य अभियंता यांनी वेतन गट ३ मध्ये तांत्रिक मंजूर पदे ४९३ असून भरलेली पदे २६२ आहेत. तसेच अतांत्रिकची ४४७ पदे मंजूर असून २९८ पदे भरण्यात आलेली आहेत. वेतनगट ३ मधील तांत्रिक व अतांत्रिकची एकूण ९४० मंजूर पदांपैकी ५६० पदे भरण्यात आलेली आहेत. वेतन गट ४ मध्ये तांत्रिकची मंजूर पदे १०८१ असून भरलेली पदे ८८१ आहे. वेतनगट-४ मध्ये अतांत्रिकची ६६ पदे मंजूर असून त्यापैकी ४७ पदे भरण्यात आलेली आहेत. वेतनगट ४ मध्ये तांत्रिक व अतांत्रिकची मंजूर पदे ११४७ असून भरलेली पदे ९२८ आहे. वेतनगट ३ व ४ मधील एकूण तांत्रिकची मंजूर पदे १५७४ असून ११४३ पदे भरण्यात आलेली आहेत व अतांत्रिकची मंजूर पदे ५१३ असून त्यापैकी ३४५ पदे भरलेली आहेत.

**अनुसूचित जमातीची सरळसेवेने भरलेली पदे.-** वेतनगट ३ मध्ये तांत्रिकच्या राखीव १७ पदापैकी १० पदे भरलेली असून वेतनगट ४ मध्ये तांत्रिकच्या राखीव ४५ पदांपैकी ४१ पदे भरण्यात आलेली आहेत. एकूण राखीव ६२ पैकी ५१ पदे भरण्यात आलेली आहेत. वेतनगट - ३ मध्ये अतांत्रिकच्या राखीव २५ पदांपैकी १० पदे भरण्यात आलेली असून वेतनगट-४ मध्ये अतांत्रिकच्या राखीव ७ पदांपैकी १ पदे भरण्यात आलेले आहे. एकूण ३२ पदांपैकी ११ पदे भरण्यात आलेली आहेत. वेतनगट ३ व ४ मध्ये तांत्रिक व अतांत्रिकच्या ९४ पदांपैकी ६२ पदे भरण्यात आलेली आहेत.

**अनुसूचित जमातीची पदोन्नतीने भरलेली पदे.-** वेतनगट ३ मध्ये तांत्रिकच्या १९ राखीव पदांपैकी १२ पदे भरलेली आहे. वेतनगट ४ मध्ये राखीव ३१ पदे असून त्यापैकी २७ पदे भरलेली आहेत. तांत्रिकची एकूण ५० पदांपैकी ३९ पदे भरण्यात आलेली आहेत व अतांत्रिकच्या वेतनगट ३ मधील राखीवच्या ७ पदांपैकी ४ पदे भरण्यात आलेली आहेत. वेतनगट ३ च्या भरलेल्या तांत्रिक

व अतांत्रिकच्या राखीव २६ पदांपैकी १६ पदे भरण्यात आलेली आहेत. वेतनगट ४ मध्ये तांत्रिक व अतांत्रिकच्या राखीव ३१ पदांपैकी २७ पदे भरण्यात आलेली आहेत. एकूण पदोन्नतीने ५७ पदांपैकी ४३ पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत.

सन २००० ते २००८ पर्यंत नियामक आयोगाच्या आदेशानुसार सरळसेवा भरतीवर बंदी असल्यामुळे सरळसेवेने भरावयाचा अनुसूचित जमातीचा अनुशेष पूर्णपणे भरता आला नाही. पदोन्नतीने भरावयाचा अनुसूचित जमातीचा अनुशेष पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे भरता आला नाही. अशी समितीला माहिती दिली.

वेतनगट ३ व ४ श्रेणीमध्ये अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचा अनुशेष सध्या किती आहे, सदर अनुशेष भरण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत अशी समितीने पृच्छा केली असता, मुख्य अभियंता यांनी पुढीलप्रमाणे सरळ सेवेने व पदोन्नतीने पदे भरण्याबाबतचा अनुशेष याबाबतची माहिती दिली.

**अनुसूचित जमातीचा सरळ सेवेचा अनुशेष.-** वेतनगट-३ मध्ये तांत्रिकची सरळसेवेची ७ पदे असून वेतनगट-४ ची ०४ पदे आहेत अशी एकूण ११ पदे आहेत. वेतनगट-३ मध्ये अतांत्रिकची १५ पदे व वेतनगट ४ ची ६ पदे आहेत. अशी एकूण पदे २१ आहेत. वेतनगट ३ मध्ये तांत्रिक व अतांत्रिकची एकूण पदे २२ असून वेतनगट -४ मध्ये तांत्रिक व अतांत्रिकची १० पदे असून एकूण ३२ पदांचा अनुशेष आहे.

**अनुसूचित जमातीचा पदोन्नतीचा अनुशेष.-** वेतनगट - ३ मध्ये तांत्रिक व अतांत्रिकचे १० पदे असून वेतनगट - ४ मध्ये तांत्रिक व अतांत्रिकची ०४ पदे आहेत असा एकूण १४ पदांचा अनुशेष आहे. वेतनगट - ३ व ४ मध्ये तांत्रिक व अतांत्रिक पदांमध्ये एकूण ४६ पदांचा अनुशेष आहे. अपंगाच्या विशेष भरती मोहिमेअंतर्गत अनुसूचित जमातीचा १ कनिष्ठ तंत्रज्ञ वेतनगट-४ मध्ये नियुक्त करण्यात आला आहे. तसेच गेल्या दोन वर्षात पदोन्नतीने अनुसूचित जमातीच्या वेतन गट-३ मधील २ कर्मचाऱ्यांना व वेतन गट-४ मधील एका कर्मचाऱ्यास पदोन्नती देण्यात आली आहे. शासन आणि उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार प्रथम अनुशेष भरलेला आहे. सन २००३-२००४ मध्ये भरती प्रक्रियेवर बंदी होती. सन २००८ मध्ये भरतीवरील बंदी उठविण्यात आली आहे. सन २००३-२००४ मध्ये ३७ हजार स्टाफ एक्सेस होता त्यामुळे अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांचा आढावा घेऊन त्याप्रमाणे पदे भरावी असे आदेश होते. त्याप्रमाणे अगोदर अनुशेष भरुन जागा भरण्याच्या संदर्भात निदेश दिले जाणार आहेत. असे समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. परिमंडळ औरंगाबाद या कार्यालयाअंतर्गत भरावयाची तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील पदे सन २००० ते २००८ पर्यंत नियामक आयोगाच्या आदेशानुसार भरतीवर बंदी असल्यामुळे अनुसूचित जमातीची सरळसेवेतील वेतनगट ३ मध्ये २२ व वेतनगट -४ मध्ये १० अशा एकूण ३२ पदांचा तसेच पदोन्नतीतील वेतनगट ३ मध्ये १० व वेतन गट-४ मध्ये ४ पदांचा अशा एकूण १४ पदांचा अनुशेष दाखविण्यात आलेला आहे. साक्षीच्या वेळी अनुसूचित जमातीचा शिल्लक असलेला अनुशेष भरण्यात येईल असे आश्वासति केलेले आहे. त्यानुसार भरतीवरील बंदीचा कालावधी संपल्यानंतर परिमंडळ औरंगाबाद या कार्यालयाने सरळसेवा व पदोन्नतीने भरावयाचा एकूण ४६ पदांचा शिल्लक असलेला संवर्गनिहाय अनुसूचित जमातीचा अनुशेष भरण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आलेली आहे. अनुशेष भरण्याच्या दृष्टिने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

(चार) विद्युत वितरण कंपनीमार्फत अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना :

औरंगाबाद परिमंडळांतील राजीव गांधी विद्युतीकरण योजनेंतर्गत किती खर्च करण्यात आला आहे अशी समितीने पृच्छा केली, मुख्य अभियंता यांनी राजीव गांधी विद्युतीकरण योजनेंतर्गत औरंगाबाद जिल्ह्याचे विद्युतीकरण करण्यासाठी एक यंत्रणा नेमण्यात आली आहे. या योजनेंतर्गत ५८ हजार नवीन सिंगल फेजिंगचे काम हाती घेतले आहे. राजीव गांधी विद्युतीकरण योजना जिल्ह्यामध्ये डिसेंबर-२००८ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सध्या प्राथमिक स्वरुपाची कामे सुरु आहेत. असे समितीला सांगितले.

राजीव गांधी विद्युतीकरण योज़नेंतर्गत किती आदीवासी पाडे/वाड्या/वस्त्यांचा सर्व्हे केला आहे त्यापैकी किती आदिवासी भागाचे विद्युतीकरण केले आहे व किती आदिवासी लाभार्थ्यांना वीजेचे कनेक्शन दिले आहे. राजीव गांधी विद्युतीकरण योजनेव्दारे या परिमंडळ कार्यालयाकडून एकही कनेक्शन दिलेले नाही असे दिसून येत आहे. या कामाचे कंत्राट कोणाकडे दिलेले आहे. इतर

जिल्ह्यांच्या ठिकाणी अनेक लोकांना या योजनेव्दारे कनेक्शन्स मिळालेली आहेत. ही योजना या जिल्ह्यात का राबविण्यात आली नाही अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर कार्यकारी अभियंता यांनी कंत्राटदाराने या योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामास सुरुवात केलेली आहे. कामासाठी लागणारे मटेरिअल देखील आलेले आहे. या योजनेअंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यात एकूण ५८ हजार विद्युत कनेक्शन्स द्यावयाची आहेत. या कामासाठी कंत्राटदारास अठरा महिन्याचा कालावधी दिलेला आहे. **सप्टेंबर २०१० पर्यंत ५८ हजार विद्युत कनेक्शन्स द्यावयाची आहेत अशी समितीला माहिती दिली. विद्युत कनेक्शन जोडणीस कंत्राटदार काम करीत नसेल तर आपण त्याच्यावर कारवाई केली पाहिजे. कंत्राटदाराला नोटीस द्यावी व राजीव गांधी विद्युतीकरण योजनेचे काम युध्द पातळीवर सुरु करावे. असे समितीने निदेश दिले.**

औरंगाबाद जिल्ह्यातील आदिवासी भागातील गावांमध्ये-पाड्यांमध्ये विद्युत पोल न उभारल्यामुळे ती गावे वीजेपासून वंचित राहिली आहे अशी किती गावे-वाड्या विद्युतीकरणापासून वंचित आहेत. आदिवासी भागातील किती वाड्या/वस्त्यातील लोकांकडून पाणी कनेक्शनची मागणी आली आणि किती लोकांना पाणी कनेक्शन दिले आहे. आदिवासी भागात विद्युतीकरणासाठी आदिवासी विभागाकडून किती निधी प्राप्त झाला आहे. राजीव गांधी विद्युतीकरण योजना जिल्ह्यामध्ये डिसेंबर २००८ पासून राबवित असतांना या योजनेअंतर्गत सध्या प्राथमिक स्वरुपाची कोणती कामे सुरु आहेत. अशी समितीने विचारणा केली.

राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत एकूण १३०२ गावांतील एकूण ५८५३३ दारिद्र रेषेखालील लाभार्थींना वीज जोडण्या देण्यात येणार आहे. योजनेवर एकूण २३.०० कोटी रुपये खर्च होणार आहे. सदरील योजनेचे काम दिनांक ०२.०३.२००९ रोजी मे. सुदर्शन ईलेक्ट्रीकल, उस्मानाबाद यांना देण्यात आले असून काम पूर्ण करण्याची मुदत १८ महिने देण्यात आली आहे. **या योजनेत आदिवासींची खालीलप्रमाणे २७ गावे** समाविष्ट करण्यात आली असून त्यातील एकूण ६३३ लाभार्थ्यांना सवलतीच्या दरामध्ये घरगुती वीज जोडणी देण्यात येणार आहे असे समितीला सांगितले.

**आदिवासी गावांतील राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत वीज जोडणी देण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांचा तपशील :--**

| अ.क्र. (१) | गावांची नावे (२) | तालुका (३) | संख्या (४) |
|---|---|---|---|
| १ | चिवली | कन्नड | २६ |
| २ | तांडा खुर्द | पैठण | ७ |
| ३ | टिटवी | सोयगाव | ५३ |
| ४ | रेलगाव | सिल्लोड | ४८ |
| ५ | वाकी | पैठण | १० |
| ६ | कोलापूर | कन्नड | २६ |
| ७ | पेदकवाडी | कन्नड | २६ |
| ८ | शिप्ट घाट | कन्नड | १५ |
| ९ | पानस | सिल्लोड | १० |
| १० | डकला | सिल्लोड | १५ |
| ११ | शिरसाळा | सिल्लोड | ३८ |
| १२ | दस्तापूर | सोयगाव | १० |
| १३ | वाडी चिमणापूर | कन्नड | ७८ |
| १४ | वडाळी | सिल्लोड | १५ |
| १५ | आमसारी | सिल्लोड | १४ |
| १६ | हल्दा | सिल्लोड | १४ |
| १७ | हटटी | सिल्लोड | १० |
| १८ | जैनपुर | पैठण | १० |
| १९ | गौताळा | कन्नड | ५ |
| २० | सनस वाडी | सिल्लोड | २७ |
| २१ | लेनापूर | सोयगाव | २५ |
| २२ | महालब्दा | सोयगाव | ६० |
| २३ | कलदरी | सोयगाव | ८ |
| २४ | काजीपूर | सिल्लोड | १० |
| २५ | अंबाला | कन्नड | ३ |
| २६ | धिंगापूर | सोयगाव | ५८ |
| २७ | पळसखेडा (सावळा) | सोयगाव | १२ |
| | | **एकूण . .** | **६३३** |

अभिप्राय व शिफारशी :

राजीव गांधी विद्युतीकरण योजना डिसेंबर, २००८ पासून जिल्ह्यामध्ये राबवित असतांना या योजनेअंतर्गत आदिवासी भागातील एकूण १३०२ गावांमध्ये एकूण ५८,५३३ दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना वीज जोडण्या सप्टेंबर, २०१० पर्यंत देण्यात येणार आहेत या योजनेवर एकूण २३ कोटी रुपये खर्च होणार आहे, असे समितीला दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने राजीव गांधी विद्युतीकरण योजनेचे काम युध्द पातळीवर सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कारवाई करण्यात आलेली आहे व केलेल्या कारवाईनुसार सप्टेंबर, २०१० पर्यंत प्रत्यक्षात आदिवासी भागातील किती लाभार्थ्यांना वीज कनेक्शन देण्यात आलेले आहे व किती प्रलंबित आहे याबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## सं.व.सु.मंडळ, यवतमाळ

### प्रपत्र - १

### वेतन गट -३ व ४ मधील तांत्रीक आणि अतांत्रिक संवर्गातील मंजूर व भरलेली पदे दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | तपशिल | मंजूर | कार्यरत | रिक्त | अतिरिक्त | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | **वेतन गट - ३** | | | | | |
| **(अ)** | **तांत्रिक पदे** | | | | | |
| (१) | कारागीर (क) | ० | १२ | ० | १२ | |
| (२) | कारागीर (क) मिटर वाचक | ७० | १५ | ५५ | ० | |
| (३) | मीटर चाचणी श्रेणी-२ | ० | ९ | ० | ९ | |
| (४) | कनिष्ठ यंत्र चालक | १३८ | १०९ | २९ | ० | |
| (५) | वरिष्ठ तंत्रज्ञ | १२७ | ७१ | ५६ | ० | |
| (६) | सहाय्यक यंत्र चालक | ४६ | ४५ | १ | ० | |
| (७) | कारागीर (अ) | ० | ५ | ० | ५ | |
| (८) | कारागीर (ब) | ० | ७ | ० | ७ | |
| (९) | मीटर चाचणी श्रेणी-१ | ० | १ | ० | १ | |
| (१०) | वाहिनी कार्यदेशक | ० | ९ | ० | ९ | |
| (११) | वाहिनी निरीक्षक | ० | ० | ० | ० | |
| | **एकूण तांत्रिक पदे** | **३८१** | **२८३** | **१४१** | **४३** | |
| **(ब)** | **अतांत्रिक पदे** | | | | | |
| (१) | उच्चस्तर लिपीक (लेखा) | ४२ | ४१ | १ | ० | |
| (२) | उच्चस्तर लिपीक (साप्रवि) | २१ | १५ | ६ | ० | |
| (३) | निम्नस्तर लिपीक/कार्या. सहा. | १५४ | १११ | ४३ | ० | |
| (४) | लघु टंकलेखक | ३ | ० | ३ | ० | |
| (५) | लघुलेखक | १ | १ | ० | ० | |
| (६) | अनुरेखक | ० | २ | ० | २ | |

प्रपत्र -१--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| (७) | कनिष्ठ आरेखक | ० | २ | ० | २ | |
| (८) | टंकलेखक | ० | ९ | ० | ९ | |
| (९) | निम्नस्तर लिपीक-नि-टंकलेखक | ० | ० | ० | ० | |
| (१०) | दूरध्वनी चालक | १ | ० | १ | ० | |
| (११) | वाहन चालक | ० | ८ | ० | ८ | |
| | **एकुण अतांत्रिक पदे** | **२२२** | **१८९** | **५४** | **२१** | |
| | **वेतन गट - ३ एकूण पदे** | **६०३** | **४७२** | **१९५** | **६४** | |
| **(अ)** | **वेतन गट - ४** | | | | | |
| **(अ)** | **तांत्रिक पदे** | | | | | |
| (१) | तंत्रज्ञ (ALM) | ५५० | ४५७ | ९३ | ० | |
| (२) | कनिष्ठ तंत्रज्ञ (LH) | २७९ | २६९ | १० | ० | |
| (३) | कारागीर (ड) | ० | ४ | ० | ४ | |
| | **एकूण तांत्रिक पदे** | **८२९** | **७३०** | **१०३** | **४** | |
| **(ब)** | **अतांत्रिक पदे** | | | | | |
| (१) | खानसामा | ० | २ | ० | २ | |
| (२) | शिपाई | १० | २४ | ० | १४ | |
| (३) | दफ्तरी | ० | १ | ० | १ | |
| (४) | पहारेकरी | ० | ४ | ० | ४ | |
| (५) | वाहन स्वच्छक | ० | ६ | ० | ६ | |
| (६) | सफाईदार | ० | २ | ० | २ | |
| (७) | माळी | ० | ३ | ० | ३ | |
| | **एकूण अतांत्रिक पदे** | **१०** | **४२** | **०** | **३२** | |
| | **वेतन गट - ४ एकूण पदे** | **८३९** | **७७२** | **१०३** | **३६** | |
| | **एकूण पदे** | **१४४२** | **१२४४** | **२९८** | **१००** | |

## प्रपत्र - २

सरळ सेवा व पदोन्नती मधील अनुसूचित जमातीची राखीव पदे, भरलेली पदे व अनुशेषाची पदे दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | तपशिल | अनुसूचित जमातीची राखीव पदे | | | अनुसूचित जमातीची भरलेली पदे | | | अनुसूचित जमातीची अनुशेषाची पदे | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| | **वेतन गट-३** | | | | | | | | | | |
| | **तांत्रिक** | | | | | | | | | | |
| १ | कारागीर अ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| २ | कारागीर -क मि.वाचक | १० | ० | १० | ० | ० | ० | १० | ० | १० | |
| ३ | मिटर टेस्टर ग्रेड II | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ४ | सहा.यंत्रचालक | ० | ३ | ३ | ० | ३ | ३ | ० | ० | ० | |
| ५ | कनिष्ठ यंत्रचालक | १९ | ० | १९ | १७ | ० | १७ | २ | ० | २ | |
| ६ | वाहिनी कार्यदेशक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ७ | वाहिनी निरिक्षक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ८ | वरिष्ठ तंत्रज्ञ | ० | ९ | ९ | ० | ६ | ६ | ० | ३ | ३ | |
| | **एकूण . .** | **२९** | **१२** | **४१** | **१७** | **९** | **२६** | **१२** | **३** | **१५** | |
| | **अतांत्रिक** | | | | | | | | | | |
| ९ | उच्च लिपीक (साप्रवि) | ० | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | |
| १० | उच्च लिपीक (लेखा) | १ | २ | ३ | १ | १ | २ | ० | १ | १ | |
| ११ | निम्नस्तर लिपीक | २२ | ० | २२ | १० | ० | १० | १२ | ० | १२ | |
| १२ | लघुटंकलेखक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १३ | टंकलेखक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १४ | लिपीक-नि-टंकलेखक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १५ | दूरध्वनी चालक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १६ | वाहन चालक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | **एकूण . .** | **२३** | **३** | **२६** | **११** | **२** | **१३** | **१२** | **१** | **१३** | |
| | **वेतन गट-३ एकूण** | **५२** | **१५** | **६७** | **२८** | **११** | **३९** | **२४** | **४** | **२८** | |

## प्रपत्र -२--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **वेतन गट-४** | | | | | | | | | | |
| | **तांत्रिक** | | | | | | | | | | |
| १ | तंत्रज्ञ | ० | ३९ | ३९ | ० | ३४ | ३४ | ० | ५ | ५ | |
| २ | कनिष्ठ तंत्रज्ञ | ३९ | ० | ३९ | १३ | ० | १३ | २६ | ० | २६ | |
| | **एकूण** | **३९** | **३९** | **७८** | **१३** | **३४** | **४७** | **२६** | **५** | **३१** | |
| | **अतांत्रिक** | | | | | | | | | | |
| ३ | पहारेकरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ४ | शिपाई | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ५ | वाहन स्वच्छक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | **एकूण** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | |
| | **वेतन गट-४ एकूण** | **३९** | **३९** | **७८** | **१३** | **३४** | **४७** | **२६** | **५** | **३१** | |
| | **एकूण बेरीज** | **९१** | **५४** | **१४५** | **४१** | **४५** | **८६** | **५०** | **९** | **५९** | |

## प्रपत्र - ३

## अनुसूचित जमातीचा अनुशेष (पदोन्नती )

| अ.क्र. | तपशिल | अधिकारी/कर्मचारी मंजूर पदे | | | | | टक्केवारी नुसार अनुसूचित जमाती कर्मचाऱ्यांचे आरक्षण | | | | | अनुसूचित जमातीची भरलेली पदे | | | | | अनुशेष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | |
| | | १ | २ | ३ | ४ | एकुण | १ | २ | ३ | ४ | एकुण | १ | २ | ३ | ४ | एकुण | १ | २ | ३ | ४ | एकुण |
| १ | यवतमाळ मंडळ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | तांत्रिक | ० | ० | १७३ | ५५० | ७२३ | ० | ० | १२ | ३९ | ५१ | ० | ० | ९ | ३४ | ४३ | ० | ० | ३ | ५ | ८ |
| | अतांत्रिक | ० | ० | ५५ | ० | ५५ | ० | ० | ३ | ० | ३ | ० | ० | २ | ० | २ | ० | ० | १ | ० | १ |
| | एकूण बेरीज | ० | ० | २२८ | ५५० | ७७८ | ० | ० | १५ | ३९ | ५४ | ० | ० | ११ | ३४ | ४५ | ० | ० | ४ | ५ | ९ |

## प्रपत्र - ४

## अनुसूचित जमातीचा अनुशेष (सरळसेवा)

| अ.क्र. | तपशिल | अधिकारी/कर्मचारी मंजूर पदे | | | | | टक्केवारी नुसार अनुसूचित जमाती कर्मचाऱ्यांचे आरक्षण | | | | | अनुसूचित जमातीची भरलेली पदे | | | | | अनुशेष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | |
| | | १ | २ | ३ | ४ | एकुण | १ | २ | ३ | ४ | एकुण | १ | २ | ३ | ४ | एकुण | १ | २ | ३ | ४ | एकुण |
| १ | सं. व. सु. मंडळ, यवतमाळ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | तांत्रिक | ० | ० | २०८ | २७९ | ४८७ | ० | ० | २९ | ३९ | ६८ | ० | ० | १७ | १३ | ३० | ० | ० | १२ | २६ | ३८ |
| | अतांत्रिक | ० | ० | १६७ | १० | १७७ | ० | ० | २३ | ० | २३ | ० | ० | ११ | ० | ११ | ० | ० | १२ | ० | १२ |
| | एकूण बेरीज | ० | ० | ३७५ | २८९ | ६६४ | ० | ० | ५२ | ३९ | ९१ | ० | ० | २८ | १३ | ४१ | ० | ० | २४ | २६ | ५० |

## प्रपत्र - ५

# अनुसूचित जमातीचा जात पडताळणी प्रकरणे (सरळसेवा)

| अ.क्र. | तपशिल | अधिकारी/कर्मचारी मंजूर पदे | | | | | टक्केवारी नुसार अनुसूचित जमाती कर्मचाऱ्यांचे आरक्षण | | | | | अनुसूचित जमातीची भरलेली पदे | | | | | अनुशेष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | |
| | | १ | २ | ३ | ४ | एकूण | १ | २ | ३ | ४ | एकूण | १ | २ | ३ | ४ | एकूण | १ | २ | ३ | ४ | एकूण |
| १ | सं. व. सु. मंडळ, यवतमाळ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | तांत्रिक | ० | ० | २०८ | २७९ | ४८७ | ० | ० | २९ | ३९ | ६८ | ० | ० | १७ | १३ | ३० | ० | ० | १२ | २६ | ३८ |
| | अतांत्रिक | ० | ० | १६७ | १० | १७७ | ० | ० | २३ | ० | २३ | ० | ० | ११ | ० | ११ | ० | ० | १२ | ० | १२ |
| | एकूण बेरीज | ० | ० | ३७५ | २८९ | ६६४ | ० | ० | ५२ | ३९ | ९१ | ० | ० | २८ | १३ | ४१ | ० | ० | २४ | २६ | ५० |

| अ.क्र. | तपशिल | ज्या अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे जातीचे दाखले तपासले आहेत त्यांची संख्या | | | | | ज्या अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे जातीचे दाखले तपासले नाहीत त्यांची संख्या | | | | | जात पडताळणी समितीकडे पाठविलेल्या प्रकरणांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | |
| | | १ | २ | ३ | ४ | एकूण | १ | २ | ३ | ४ | एकूण | १ | २ | ३ | ४ | एकूण |
| १ | सं. व. सु. मंडळ, यवतमाळ | | | | | | | | | | | | | | | |
| | तांत्रिक | ० | ० | १७ | ९ | २६ | ० | ० | ० | ४ | ४ | ० | ० | ० | १ | १ |
| | अतांत्रिक | ० | ० | ९ | ० | ९ | ० | ० | २ | ० | २ | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण बेरीज | ० | ० | २६ | ९ | ३५ | ० | ० | २ | ४ | ६ | ० | ० | ० | १ | १ |

## प्रपत्र - ६

# अनुसूचित जमाती - जात पडताळणी प्रकरणे (पदोन्नती)

| अ.क्र. | तपशिल | अधिकारी/कर्मचारी मंजूर पदे | | | | | टक्केवारी नुसार अनुसूचित जमाती कर्मचाऱ्यांचे आरक्षण | | | | | अनुसूचित जमातीची भरलेली पदे | | | | | अनुशेष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | |
| | | १ | २ | ३ | ४ | एकुण | १ | २ | ३ | ४ | एकुण | १ | २ | ३ | ४ | एकुण | १ | २ | ३ | ४ | एकुण |
| १ | यवतमाळ मंडळ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | तांत्रिक | ० | ० | १७३ | ५५० | ७२३ | ० | ० | १२ | ३९ | ५१ | ० | ० | ९ | ३४ | ४३ | ० | ० | ३ | ५ | ८ |
| | अतांत्रिक | ० | ० | ५५ | ० | ५५ | ० | ० | ३ | ० | ३ | ० | ० | २ | ० | २ | ० | ० | १ | ० | १ |
| | एकूण बेरीज | ० | ० | २२८ | ५५० | ७७८ | ० | ० | १५ | ३९ | ५४ | ० | ० | ११ | ३४ | ४५ | ० | ० | ४ | ५ | ९ |

| अ.क्र. | तपशिल | ज्या अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे जातीचे दाखले तपासले आहेत त्यांची संख्या | | | | | ज्या अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे जातीचे दाखले तपासले नाहीत त्यांची संख्या | | | | | जात पडताळणी समितीकडे पाठविलेल्या प्रकरणांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | | वेतनगट | | | | |
| | | १ | २ | ३ | ४ | एकुण | १ | २ | ३ | ४ | एकुण | १ | २ | ३ | ४ | एकुण |
| १ | यवतमाळ मंडळ | | | | | | | | | | | | | | | |
| | तांत्रिक | ० | ० | ७ | २२ | २९ | ० | ० | २ | १२ | १४ | ० | ० | ० | ० | ०० |
| | अतांत्रिक | ० | ० | २ | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण बेरीज | ० | ० | ९ | २२ | ३१ | ० | ० | २ | १२ | १४ | ० | ० | ० | ० | ०० |

## प्रपत्र - ७

## वेतन गट -३ व ४ मधील तांत्रीक आणि अतांत्रिक संवर्गातील मंजूर व भरलेली पदे दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. (१) | तपशिल (२) | मंजूर (३) | कार्यरत (४) | रिक्त (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| | **वेतन गट-३** | | | | |
| **(अ)** | **तांत्रिक पदे** | | | | |
| १ | कारागीर (क) | १३ | ० | १३ | .. |
| २ | मीटर चाचणी, श्रेणी-२ | ८ | १ | ७ | .. |
| ३ | कनिष्ठ यंत्र चालक | २१५ | १२५ | ९० | .. |
| ४ | वरिष्ठ तंत्रज्ञ | १४७ | ६९ | ७८ | .. |
| ५ | सहाय्यक यंत्र चालक | ५५ | ४६ | ९ | .. |
| ६ | कारागीर (अ) | १५ | ९ | ६ | .. |
| ७ | कारागीर (ब) | ९ | ७ | २ | .. |
| ८ | मीटर चाचणी, श्रेणी-१ | ३ | ३ | ० | .. |
| ९ | वाहिनी कार्यदेशक | ५ | ० | ५ | .. |
| १० | वाहिनी निरीक्षक | २१ | ० | २१ | .. |
| ११ | अनुरेखक | २ | २ | ० | .. |
| | **एकूण तांत्रिक पदे** | **४९३** | **२६२** | **२३१** | .. |
| **(ब)** | **अतांत्रिक पदे** | | | | |
| १ | उच्चस्तर लिपीक (लेखा) | ७० | ५३ | १७ | .. |
| २ | उच्चस्तर लिपीक (साप्रवि) | १५ | १५ | ० | .. |
| ३ | निम्नस्तर लिपीक | २६० | १८४ | ७६ | .. |
| ४ | लघु टंकलेखक | १० | ७ | ३ | .. |
| ५ | लघुलेखक | २ | २ | ० | .. |
| ६ | आरेखक | २ | ० | २ | .. |
| ७ | कनिष्ठ आरेखक | २ | ० | २ | .. |
| ८ | टंकलेखक | ८ | ६ | २ | .. |

प्रपत्र - ७--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ९ | निम्नस्तर लिपीक-नि-टंकलेखक. | १२ | १ | ११ | .. |
| १० | दूरध्वनी चालक | १८ | १७ | १ | .. |
| ११ | वाहन चालक | ४८ | १३ | ३५ | .. |
| | **एकूण अतांत्रिक पदे** | **४४७** | **२९८** | **१४९** | .. |
| | **वेतन गट - ३ एकूण पदे** | **९४०** | **५६०** | **३८०** | .. |
| **(अ)** | **वेतन गट - ४** | | | | |
| **(अ)** | **तांत्रिक पदे** | | | | |
| १ | तंत्रज्ञ (ALM) | ४४४ | ३३२ | ११२ | .. |
| २ | कनिष्ठ तंत्रज्ञ (LH) | ६३५ | ५४९ | ८६ | .. |
| ३ | कारागीर (ड) | २ | ० | २ | .. |
| | **एकूण तांत्रिक पदे** | **१०८१** | **८८१** | **२००** | .. |
| **(ब)** | **अतांत्रिक पदे** | | | | |
| १ | शिपाई | ३९ | ३० | ९ | .. |
| २ | दफ्तरी | २ | २ | ० | .. |
| ३ | पहारेकरी | १३ | ५ | ८ | .. |
| ४ | वाहन स्वच्छक | ११ | ९ | २ | .. |
| ५ | सफाईदार | १ | १ | ० | .. |
| | **एकूण अतांत्रिक पदे** | **६६** | **४७** | **१९** | .. |
| | **वेतन गट - ४ एकूण पदे** | **११४७** | **९२८** | **२१९** | .. |
| | **एकूण पदे** | **२०८७** | **१४८८** | **५९९** | .. |

## प्रपत्र - ८

## सरळ सेवा व पदोन्नती मधील अनुसूचित जमातीची राखीव पदे, भरलेली पदे व अनुशेषाची पदे दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | तपशिल | अनुसूचित जमातीची राखीव पदे | | | अनुसूचित जमातीची भरलेली पदे | | | अनुसूचित जमातीची अनुशेषाची पदे | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| | **वेतन गट-३** | | | | | | | | | | |
| | **तांत्रिक** | | | | | | | | | | |
| १ | कारागीर अ | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | |
| २ | कारागीर -ब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ३ | कारागीर -क | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | |
| ४ | मिटर टेस्टर ग्रेड I | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ५ | मिटर टेस्टर ग्रेड II | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | |
| ६ | सहा.यंत्रचालक | ० | ५ | ५ | ० | १ | १ | ० | ४ | ४ | |
| ७ | कनिष्ठ यंत्रचालक | १५ | ० | १५ | १० | ० | १० | ५ | ० | ५ | |
| ८ | अनुरेखक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ९ | वाहिनी कार्यदेशक | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | |
| १० | वाहिनी निरिक्षक | ० | २ | २ | ० | १ | १ | ० | १ | १ | |
| ११ | वरिष्ठ तंत्रज्ञ | ० | १० | १० | ० | १० | १० | ० | ० | ० | |
| | **एकूण . .** | **१७** | **१९** | **३६** | **१०** | **१२** | **२२** | **७** | **७** | **१४** | |
| | **अतांत्रिक** | | | | | | | | | | |
| १२ | उच्च लिपीक (साप्रवि) | ० | २ | २ | ० | १ | १ | ० | १ | १ | |
| १३ | उच्च लिपीक (लेखा) | ० | ४ | ४ | ० | ३ | ३ | ० | १ | १ | |
| १४ | निम्नस्तर लिपीक | १७ | १ | १८ | ९ | ० | ९ | ८ | १ | ९ | |
| १५ | लघुटंकलेखक | २ | ० | २ | ० | ० | ० | २ | ० | २ | |
| १६ | आरेखक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १७ | टंकलेखक | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | |
| १८ | लिपीक-नि-टंकलेखक | १ | ० | १ | १ | ० | ० | १ | ० | १ | |
| १९ | दूरध्वनी चालक | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | |
| २० | वाहन चालक | ३ | ० | ३ | ० | ० | ० | ३ | ० | ३ | |
| | **एकूण . .** | **२५** | **७** | **३२** | **१०** | **४** | **१४** | **१५** | **३** | **१८** | |
| | **वेतन गट ३ एकूण** | **४२** | **२६** | **६८** | **२०** | **१६** | **३६** | **२२** | **१०** | **३२** | |

प्रपत्र - ८--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेतन गट ४ | | | | | | | | | | | |
| | तांत्रिक | | | | | | | | | | |
| १ | तंत्रज्ञ | ० | ३१ | ३१ | ० | २७ | २७ | ० | ४ | ४ | |
| २ | कनिष्ठ तंत्रज्ञ | ४५ | ० | ४५ | ४१ | ० | ४१ | ४ | ० | ४ | |
| | एकूण . . | ४५ | ३१ | ७६ | ४१ | २७ | ६८ | ४ | ४ | ८ | |
| | अतांत्रिक | | | | | | | | | | |
| ३ | पहारेकरी | २ | ० | २ | १ | ० | १ | १ | ० | १ | |
| ४ | शिपाई | ३ | ० | ३ | ० | ० | ० | ३ | ० | ३ | |
| ५ | दफ्तरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ६ | वाहन स्वच्छक | २ | ० | २ | ० | ० | ० | २ | ० | २ | |
| ७ | सफाईगार | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | एकूण | ७ | ० | ७ | १ | ० | १ | ६ | ० | ६ | |
| | वेतन गट ४ एकूण | ५२ | ३१ | ८३ | ४२ | २७ | ६९ | १० | ४ | १४ | |
| | एकूण बेरीज | ९४ | ५७ | १५१ | ६२ | ४३ | १०५ | ३२ | १४ | ४६ | |

# परिशिष्ट

## बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

## पहिली बैठक

### मंगळवार, दिनांक २८ जुलै, २००९

समितीची बैंठक महराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. परिमंडळ औरंगाबाद येथील कार्यालयात झाली. सदरहू बैंठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

#### उपस्थिती

**समिती प्रमुख**

(१) श्री. महादू बरोरा, वि.स.स.

**सदस्य**

(२) डॉ. संदिप धुर्वे, वि.स.स.

(३) श्री. राजकुमार पटेल, वि.स.स.

(४) श्री. एम. एम. शेख, वि.प.स.

(५) श्री. दिलीप सोनावणे, वि.प.स.

(६) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म. मु. काज, उप सचिव.

(२) श्री. ला. ना. जाधव, समिती अधिकारी.

**आयुक्त कार्यालय, (मावक) औरंगाबाद :**

श्री. शिवाजी दिवेकर, सहा. आयुक्त.

**आदिवासी विकास विभाग :**

श्री. जी. एच. जवळेकर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

(१) श्री. कालेवाड, महाव्यवस्थापक

(२) श्री. कडप्पा, व्यवस्थापक

(३) श्री. शिर्शिकर, मुख्य अभियंता

(४) श्री. धंतोल, अधीक्षक अभियंता

(५) श्री. पवार, अधीक्षक अभियंता

समितीने या बैठकीत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., परिमंडळ कार्यालय, औरंगाबाद येथे भेट दिली या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच आदिवासी जमाती करीता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून माहिती घेतली.

## दुसरी बैठक

### बुधवार, दिनांक ५ ऑगस्ट, २००९

समितीची बैठक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, परिमंडळ यवतमाळ येथील कार्यालयात झाली. सदरहू बैठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

**कार्यकारी समिती प्रमुख**

(१) डॉ.संदिप धुर्वे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.दिलीप सोनावणे, वि.प.स

(३) श्री.परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री.म.मु.काज, उप सचिव.

(२) श्री.ला.ना.जाधव, समिती अधिकारी.

**आदिवासी विकास विभाग**

(१) श्री. जी.पी.गरड, अपर आयुक्त,अमरावती

(२) श्री.सारंग कोडोलकर, प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा

**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती**

(१) श्री.ए.एस.बक्षी, सहायक आयुक्त (मा.व.क.)

(२) श्री.डी.जी.चादोळे, नायब तहसिलदार (मा.व.क)

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

(१) श्री. मोहन झोडे, मुख्य अभियंता

(२) श्री. एस.एम. कालेवाड, उप महाव्यवस्थापक

(३) श्री. डी.बी.भदे, व्यवस्थापक

(४) श्री. हि.शा.राजपूत, अधिक्षक अभियंता

(५) श्री. ए.बी.बागूल, व्यवस्थापक, मा.वर्गीय कर्मचारी

(६) श्री. व्ही.डब्ल्यु कोरडे, कार्यकारी अभियंता

(७) श्री. एस.पी.वाघमारे, कार्यकारी अभियंता, यवतमाळ

समितीने या बैठकीत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.परिमंडळ कार्यालय यवतमाळ येथे भेट दिली. या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी / कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच आदिवासी जमातीकरीता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून माहिती घेतली.

## तिसरी बैठक

### शुक्रवार, दिनांक ४ जून, २०१०

समितीची बैठक विधानभवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता घेण्यात आली होती. सदरहू बैठकीस पुढीलप्रमाणे सदस्य होते.

### उपस्थिती

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री.आनंदराव गेडाम, वि.स.स.

(३) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

(४) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

(५) श्री. किसन कथोरे, वि.स.स.

(६) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

(७) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(८) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म.मु.काज, उप सचिव.

(२) श्री. ला.ना.जाधव, अवर सचिव (समिती).

**विभागीय अधिकारी :**

(१) श्री.सुब्रत रथो, सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.

(२) श्री.पी.एम.माटे, मुख्य महाव्यवस्थापक, मुंबई.

(३) श्री.किशोर शिर्सीकर, मुख्य अभियंता, औरंगाबाद.

(४) श्री.हि.शा.राजपूत, अधीक्षक अभियंता, यवतमाळ.

(५) श्री.सी.के.जाधव, उप सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.

(६) श्री.स.न.कडप्पा, व्यवस्थापक, औरंगाबाद.

समितीने या बैठकीत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. परिमंडळ कार्यालय औरंगाबाद व यवतमाळ येथील कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादी बाबत विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

## चौथी बैठक

समितीची बैठक बुधवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०१० रोजी दुपारी १.०० वाजता विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थिती

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.

**सदस्य :**

(२) प्रा. वसंत पुरके, वि.स.स.

(३) श्री.जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

(४) ॲड.चिंतामण वनगा, वि.स.स.

(५) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

(६) श्री.रमेश शेंडगे, वि.प.स.

(७) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म.मु.काज, उप सचिव.

(२) श्री. ला.ना.जाधव, अवर सचिव (समिती).

समितीने या बैठकीत प्रारूप आहवालावर विचार केला व तो संमत केला.

शामुना--एचबी-१८५६-मविमंसना-१२-२०१०-७१० प्रती-पीए५*.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.